ePaper

**कोचिंग क्लास, रक्तबंबाळ विद्यार्थी... अल्पवयीन मुलांमधील गँगवॉरमुळे पुणे हादरले**

| वर्ष - 9 | अंक -112 | UDYAM-MH-26-0158827 |

# महाईन्यूज ™

www.mahaenews.com | मंगळवार, दि. 16 डिसेंबर 2025 | पुणे, पिंपरी-चिंचवड आवृत्ती | mahaenews.com | लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!




## आतील पानांत

- लिलावात अनकॅप्ड खेळाडूंचे मूल्य
- इम्पॅक्ट प्लेअर नियम लवकरच रद्द?
- नितीश कुमार वादाच्या भोवऱ्यात!
- शत्रूंसाठी मोठी धोक्याची घंटा!

## प्रशासक राज संपणार: 29 महापालिकांच्या निवडणुकीचा बिगुल वाजला!

# महापालिकांचा महासंग्राम!

### राज्यातील एकूण 2 हजार 869 जागांसाठी 15 जानेवारीला मतदान, 16 ला मतमोजणी

| मुंबई | प्रतिनिधी |
महाईन्यूज





**राज्यातील मागील साडेतीन-चार वर्षापासून रखडलेल्या मुंबई, ठाणे, नवी मुंबई, कल्याण-डेंबिवली, पुणे, छत्रपती संभाजीनगर, नाशिक, नागपूरसह 29 महानगरपालिकांच्या निवडणुकीचा बिगुल अखेर वाजला. मुंबई महानगरपालिकेच्या 227 जागांसह राज्यातील एकूण 2 हजार 869 जागांसाठी 15 जानेवारीला मतदान घेण्यात येणार आहे. 16 जानेवारीला मतमोजणी होणार असल्याची घोषणा राज्य निवडणूक आयुक्त दिनेश वाघमारे यांनी केली. केंद्रातील भाजप सरकारकडून मुंबई व महाराष्ट्राचे महत्त्व कमी करण्याचे सुरू असलेले प्रयत्न. तसेच राज्यात तिसरी भाषा म्हणून हिंदीची सक्ती करण्याचा सुरू असलेला राज्य सरकारचा उद्योग आणि मुंबई व राज्यातील एकंदर राजकीय परिस्थिती पाहता ही निवडणूक म्हणजे मराठी माणसाच्या अस्तित्वाची खरी लढाई ठरणार आहे.**

मुंबईसह राज्यभरातील 29 महापालिका निवडणुकांची घोषणा केली. त्यानुसार 15 जानेवारी 2026 रोजी निवडणूकीसाठी मतदान होणार असून, दुसऱ्या दिवशी म्हणजे 16 जानेवारी 2026 रोजी मतमोजणी होणार आहे. या घोषणेसह या महापालिकांमध्ये आदर्श आचारसंहिता लागू झाली आहे.

राज्य निवडणूक आयुक्त दिनेश वाघमारे यांनी सह्याद्री अतिथिगृह येथे झालेल्या पत्रकार परिषदेत महानगरपालिका निवडणुकांच्या कार्यक्रमाची घोषणा केली. यावेळी आयोगाचे सचिव सुरेश काकाणी यावेळी उपस्थित होते. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका 31 जानेवारी 2026 पर्यंत घेण्याचे निर्देश सर्वोच्च न्यायालयाने दिले आहेत. सर्वोच्च न्यायालयाच्या अंतिम निकालाच्या अधीन राहून मुंबईसह राज्यातील सर्व 29 महानगरपालिका क्षेत्रात सार्वत्रिक निवडणुकीच्या कार्यक्रमाची घोषणा आयुक्त दिनेश वाघमारे यांनी केली. सर्व महानगरपालिकांसाठी 15 जानेवारी 2026 रोजी सकाळी 7.30 ते सायंकाळी 5.30 या वेळेत मतदान घेण्यात येणार असल्याची माहिती आयुक्त वाघमारे यांनी दिली.

मुंबई पालिकेत एका प्रभागातून एकच सदस्य निवडून द्यावयाचा असल्याने प्रत्येक मतदाराला केवळ एकच मत द्यावे लागेल. उर्वरित सर्व 28 पालिकांमध्ये बहुसदस्यीय प्रभाग पद्धतीमुळे प्रत्येक प्रभागात साधारणतः चार जागा असतील. काही पालिकांच्या काही प्रभागांत तीन अथवा पाच जागा असतील. मुंबई वगळता अन्य सर्व पालिका निवडणुकांमध्ये प्रत्येक मतदाराने किमान 3 ते 5 मते देणे अपेक्षित असेल.

**जातवैधता पडताळणी**

राखीव जागांवर निवडणूक लढवू इच्छिणाऱ्या उमेदवारांना उमेदवारी अर्जासोबत जात प्रमाणपत्र व जातवैधता प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे, परंतु जातवैधता प्रमाणपत्र जोडले नसल्यास जात पडताळणी समितीकडे जातवैधता प्रमाणपत्रासाठी सादर केलेल्या अर्जाची सत्यप्रत किंवा अर्ज केल्याचा पुरावा देणे आवश्यक राहील. सहा महिन्यांच्या कालावधीत जातवैधता प्रमाणपत्र सादर करण्यात येईल,' असे हमीपत्रदेखील संबंधित उमेदवारांना द्यावे लागेल. निकाल घोषित झाल्याच्या दिनांकापासून सहा महिन्यांच्या आत जातवैधता प्रमाणपत्र सादर न करू शकलेल्या संबंधित उमेदवाराची निवड रद्द होईल, असे आयुक्त वाघमारे यांनी स्पष्ट केले.

**आचारसंहिता लागू**

निवडणूक कार्यक्रम जाहीर झाल्यापासून संबंधित पालिका क्षेत्रात आचारसंहिता लागू झाली आहे. आचारसंहिता लागू झाल्यामुळे शासनाला महानगरपालिका कार्यक्षेत्राशी संबंधित धोरणात्मक निर्णय घेता येणार नाहीत. नैसर्गिक आपत्तीबाबत करावयाच्या उपाययोजना आचारसंहितेची आडकाठी असणार नाही.

**ज्येष्ठ नागरिक व दिव्यांगांनाही मतदान केंद्रावर जावे लागणार**

लोकसभा आणि विधानसभा निवडणुकीत ज्येष्ठ व दिव्यांग मतदारांच्या घरी मतदानाची सुविधा उपलब्ध करून देण्यात आली होती, मात्र स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीतील बहुसदस्य प्रभाग पद्धती लक्षात घेता ज्येष्ठ नागरिक व दिव्यांग मतदारांना मतदान केंद्रावर जाऊनच मतदान करावे लागेल, असे वाघमारे यांनी स्पष्ट केले. मतदान केंद्रांवर ज्येष्ठ नागरिक, दिव्यांग, तान्ह्याबाळासह असणाऱ्या स्त्रिया, गरोदर स्त्रिया आदींना मतदानासाठी प्राधान्य दिले जाईल. व्हिलचेअरचीही व्यवस्था असेल. मतदान केंद्रावर विजेची व्यवस्था, पिण्याच्या पाण्याची, सावलीची सुविधा उपलब्ध करून दिली जाईल.

**13 जानेवारीला प्रचार बंद; जाहिरातींना बंदी**

स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांच्या प्रचार समाप्तीसंदर्भात अधिनियमांमध्ये वेगवेगळ्या तरतुदी आहेत. महानगरपालिका निवडणुकांत मतदानाच्या 48 तास अगोदर म्हणजे 13 जानेवारीला सायंकाळी 5.30 वाजता प्रचार बंद होईल. त्यानंतर प्रचारांच्या जाहिरातींची प्रसिद्धी किंवा प्रसारणसुद्धा करता येणार नसल्याचे राज्य निवडणूक आयोगाने स्पष्ट केले.

**पिंक मतदान केंद्र**

महिला मतदारांची संख्या जास्त असलेल्या ठिकाणी 'पिंक मतदान केंद्र' म्हणून ओळखले जाईल. या ठिकाणी सर्व निवडणूक अधिकारी-कर्मचारी व पोलीस कर्मचारी महिला असणार आहेत.

## निवडणूक कार्यक्रम

**उमेदवारी अर्ज स्वीकारणे** 23 ते 30 डिसेंबर
**उमेदवारी अर्जांची छाननी** 31 डिसेंबर 2025
अर्ज माघारीची मुदत
2 जानेवारी 2026
**निवडणूक चिन्ह वाटप**
3 जानेवारी 2026
**अंतिम उमेदवार यादी**
3 जानेवारी 2026
**मतदानाची वेळ**
सकाळी 7.30 ते सायंकाळी 5.30

**मतदान केंद्र व ईव्हीएम एकूण मतदार**
3 कोटी 48 लाख 78 हजार 17

**मतदान केंद्र**
39 हजार 147

**ईव्हीएम कंट्रोल युनिट**
43 हजार 958

**बॅलेट युनिट**
87 हजार 916

## ३ हजार कोटींची भेट

## मुख्यमंत्र्यांच्या हस्ते तीन हजार कोटींच्या कामाचे लोकार्पण

# पुणे हे महाराष्ट्राचे ग्रोथ इंजिन-फडणवीस

## पस्तीस हजार कोटींचा मोबिलिटी प्लॅन



।पुणे।

प्रतिनिधी : महाईन्यूज

**पुणे हे महाराष्ट्राचे ग्रोथ इंजिन आहे. प्रत्येक राज्याला एकच कृती इंजिन आहे, परंतु महाराष्ट्राला नवी मुंबई आणि पुणे अशी दोन ग्रोथ इंजिन आहेत. पुण्याच्या विकासाचा नवा अध्याय सुरू झाला असून शहराला शाश्वत, आधुनिक आणि भविष्यासाठी सज्ज करण्याचा संकल्प राज्य सरकारने केला आहे, असे प्रतिपादन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केले. पुण्याचे प्रगतीपर्व या तीन हजार कोटींच्या विकास कामांच्या उद्घाटन आणि लोकार्पण सोहळ्यात गणेश कला क्रीडा मंच पुणे येथे बोलत होते.**

मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले, पुण्यासाठी तीस ते पस्तीस हजार कोटींचा मोबिलिटी प्लॅन तयार केला आहे. कोणतेही काम नियोजन करून केले पाहिजे . त्याला नियोजन नसेल तर केलेली कामे देखील पाडावी लागतात. त्यामुळे नियोजन करूनच मोबिलिटी प्लॅन तयार केला आहे. पुण्यात सर्वात मोठी वाहतुकीची समस्या आहे. बॉटल नेक मुळे वाहतूक समस्या निर्माण होत आहे. यासाठी शहरात टनेल नेटवर्क डेव्हलप करणार आहे. रिंग रोड तयार करण्यात आले आहेत. दोनशे किलोमीटर मेट्रोचा विस्तार केला जाणार आहे. ३२ मिसिंग लिंक रस्ते तयार करणे त्यामुळे ताशी स्पीड पाच ते दहा किलोमीटर वाढू शकते असे मुख्यमंत्री म्हणाले. पुण्याला शाश्वत शहर बनवण्यासाठी जायकाकडून २ हजार कोटी रुपयांची गुंतवणूक केली आहे. एसटीपी शहरात मोठ्या प्रमाणावर उभ्या केल्या जात आहेत. त्यामुळे पाणी शुद्ध करून सिंचनाला वापरता येईल आणि धरणातील पाणी पिण्यासाठी वापरता येईल असे फडणवीस म्हणाले.पुणे आणि मुंबई ही शहरे जगाला परिचित आहेत. आयटी, शिक्षण आणि उद्योग यांचे हे प्रमुख केंद्र आहे. आता केवळ कामासाठी नव्हे, तर उत्तम राहणीमानासाठी पुणे कसे आदर्श शहर बनेल, यावर भर दिला जात आहे. शहरातील सर्वात मोठा प्रश्न वाहतूक कोंडीचा असून, त्यावर महापालिका आणि राज्य सरकार समन्वयाने काम करत आहेत. रिंग रोड, मिसिंग लिंक, प्रमुख रस्त्यांचे रुंदीकरण, बॉटलनेक काढणे यामुळे वाहतूक सुलभ होईल. भविष्यात भुयारी मार्ग आणि बोगद्यांचा पर्यायही अभ्यासपूर्वक राबवला जाईल, असेही त्यांनी सांगितले.पाणीपुरवठ्याच्या संदर्भात ते म्हणाले, लोकसंख्या वाढीमुळे पाण्याची गरज वाढणार आहे. नव्याने मोठ्या प्रमाणात पाणी उपलब्ध होणे मर्यादित असले, तरी शुद्धीकरण आणि पुनर्वापरावर भर दिला जाईल. २४ बाय ७ पाणीपुरवठा योजना पूर्ण केली जाईल. एसटीपी प्रकल्पांचे जाळे उभारून पर्यावरणपूरक विकास साधला जाईल. पुण्याचा विकास करताना भविष्यातील गरजांचा विचार केला जात असून एआय, डेटा सेंट्रिक नियोजनावर भर देण्यात येत आहे. पुढील काळात पुणे हे महाराष्ट्राचेच नव्हे, तर देशाचे कॅपिटल बनेल, असा विश्वासही त्यांनी व्यक्त केला.पुणे हे महाराष्ट्राचे ग्रोथ इंजिन आहे. प्रत्येक राज्याला एकच कृती इंजिन आहे, परंतु महाराष्ट्राला नवी मुंबई आणि पुणे अशी दोन ग्रोथ इंजिन आहेत. पुण्याच्या विकासाचा नवा अध्याय सुरू झाला असून शहराला शाश्वत, आधुनिक आणि भविष्यासाठी सज्ज करण्याचा संकल्प राज्य सरकारने केला आहे, असे प्रतिपादन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केले. पुण्याचे प्रगतीपर्व या तीन हजार कोटींच्या विकास कामांच्या उद्घाटन आणि लोकार्पण सोहळ्यात गणेश कला क्रीडा मंच पुणे येथे बोलत होते. पुण्यासाठी तीस ते पस्तीस हजार कोटींचा मोबिलिटी प्लॅन तयार केला आहे. कोणतेही काम नियोजन करून केले पाहिजे . त्याला नियोजन नसेल तर केलेली कामे देखील पाडावी लागतात. त्यामुळे नियोजन करूनच मोबिलिटी प्लॅन तयार केला आहे. पुण्यात सर्वात मोठी वाहतुकीची समस्या आहे. बॉटल नेक मुळे वाहतूक समस्या निर्माण होत आहे.

### ३२ मिसिंग लिंक रस्ते तयार

यासाठी शहरात टनेल नेटवर्क डेव्हलप करणार आहे. रिंग रोड तयार करण्यात आले आहेत. दोनशे किलोमीटर मेट्रोचा विस्तार केला जाणार आहे. ३२ मिसिंग लिंक रस्ते तयार करणे त्यामुळे ताशी स्पीड पाच ते दहा किलोमीटर वाढू शकते असे मुख्यमंत्री म्हणाले. पुण्याला शाश्वत शहर बनवण्यासाठी जायकाकडून २ हजार कोटी रुपयांची गुंतवणूक केली आहे. एसटीपी शहरात मोठ्या प्रमाणावर उभ्या केल्या जात आहेत.

# भाजप- राष्ट्रवादीशी काडीमोड घेणार?

## निवडणूक आयोगाने जाहीर केला महापालिका निवडणुकीचा कार्यक्रम



। पुणे ।

प्रतिनिधी : महाईन्यूज

**राज्यात महापालिका निवडणुकीचा कार्यक्रम जाहीर झाला आहे. राज्य निवडणूक आयोगाने याबाबत घोषणा केली आहे. राज्य निवडणूक आयोगाने राज्यातील प्रलंबित २९ महापालिका निवडणुकांची घोषणा केली आहे. २ हजार ७८९ जागांसाठी निवडणुका होणार आहे. आजपासून आचारसंहिता लागू केली गेली आहे. याबाबत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी भाष्य केले आहे.**

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आज पुणे दौऱ्यावर होते. राज्यातील मुंबई, पुणे, पिंपरी चिंचवड या महानगरपालिकांची निवडणूक महत्वाची समजली जात आहे. दरम्यान आज निवडणूक आयोगाने महापालिका निवडणुकीची घोषणा केली आहे. त्यावर आता मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी महत्वाचे भाष्य केले आहे. निवडणूक कार्यक्रम जाहीर होताच मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी यावर भाष्य केले आहे. मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले, "या निवडणुकांमध्ये यांच्या शासनाने केलेले काम पाहता पुन्हा कौल यांच्या बाजूने येईल. जनता आम्हाला शहर विकासाची संधी देईल. आम्ही महायुती करण्याचा प्रयत्न करत आहोत. जास्तीत जास्त ठिकाणी भाजप आणि शिवसेनेची युती होईल. काही ठिकाणी भाजप-शिवसेना आणि राष्ट्रवादी अशी युती होईल."पुढे बोलताना फडणवीस म्हणाले, "काही ठिकाणी भाजप-राष्ट्रवादी अशी युती होईल. पुण्यात मात्र माझी आणि अजित पवार यांची चर्चा झाली आहे. आम्ही दोघेही इथले मोठे पक्ष आहोत. भाजपने 5 कदाचित पुण्यात राष्ट्रवादी काँग्रेस आणि भाजप आमने-सामने लढताना दिसतील.

### शिवरायांच्या पुतळ्याचे लोकार्पण

ही लढत मैत्रीपूर्ण असणार आहे. कुठेही कटुता नसेल."राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आज पुणे दौऱ्यावर आहेत. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते कात्रज कोंढवा रोडवर छत्रपती शिवाजी महाराज यांच्या अश्वारूढ पुतळ्याचे अनावरण करण्यात आले. आज मुख्यमंत्री फडणवीस पुणे दौऱ्यावर आहेत. त्यांच्या हस्ते पुण्यात आज विविध विकासकामांचे अनावरण करण्यात आले. छत्रपती शिवाजी महाराजांच्या अश्वारूढ पुतळ्याचे अनावरण मुख्यमंत्र्यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी मुख्यमंत्री फडणवीस यांनी संबोधन केले.

पिंपरी-चिंचवड महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूक २०२५

पिंपरी-चिंचवडमध्ये १७ लाख १३ हजार

# मतदार बजाविणार मतदानाचा हक्क!

## महिला मतदारांची संख्या ८ लाखांच्या पुढे, ३२ प्रभागांत निवडणूक रणधुमाळी, अंतिम यादी जाहीर

पिंपरी चिंचवड ।
प्रतिनिधी : महाईन्यूज

**पिंपरी चिंचवड : पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेच्या सार्वत्रिक निवडणूक २०२५ साठीची अंतिम मतदार यादी जाहीर झाली असून, शहरातील ३२ प्रभागांमध्ये एकूण १७ लाख १३ हजार ८९१ मतदार नोंदले गेले आहेत. यामध्ये ९ लाख ५७ हजार ७२८ पुरुष, ८ लाख ७ हजार ९६६ महिला, तर १९७ इतर मतदारांचा समावेश आहे. वाढती मतदारसंख्या लक्षात घेता आगामी निवडणुकीत चुरशीची लढत पाहायला मिळणार आहे.**



प्रभागनिहाय आकडेवारी पाहता ~~प्रभाग क्रमांक १६ मध्ये सर्वाधिक ७५~~ हजार १०५ मतदार असून, तो शहरातील सर्वात मोठा प्रभाग ठरला आहे. यानंतर प्रभाग क्रमांक ३ (७२ हजार १०६) आणि प्रभाग क्रमांक २ (६९ हजार ५१८) या प्रभागांतही मोठ्या प्रमाणावर मतदार आहेत. दुसरीकडे प्रभाग क्रमांक २३ मध्ये सर्वात कमी ३३ हजार ३३ मतदार नोंदले गेले आहेत.महिला मतदारांची संख्या अनेक प्रभागांमध्ये लक्षणीय असल्याचे चित्र आहे. काही प्रभागांत महिला मतदारांचे प्रमाण पुरुषांच्या जवळपास पोहोचले असून, याचा थेट परिणाम उमेदवारांच्या प्रचारावर आणि मुद्द्यांच्या निवडीवर होणार आहे. तसेच इतर (तृतीयपंथी) मतदारांची नोंदही जवळपास सर्व प्रभागांमध्ये असल्याने समावेशक लोकशाहीचे चित्र दिसून येत आहे.

अंतिम मतदार यादी जाहीर झाल्याने आता राजकीय हालचालींना वेग आला आहे. प्रत्येक प्रभागातील मतदारसंख्या लक्षात घेऊन पक्षांकडून रणनीती आखली जात असून, स्थानिक प्रश्न, नागरी सुविधा आणि विकासकामे हे प्रचाराचे केंद्रबिंदू ठरण्याची शक्यता आहे. वाढलेल्या मतदारसंख्येमुळे यंदाची महानगरपालिका निवडणूक अधिक निर्णायक आणि उत्सुकतेची ठरणार आहे. राज्य निवडणूक आयोगाकडून जाहीर करण्यात आलेल्या महापालिका सार्वत्रिक निवडणूक कार्यक्रमानुसार नामनिर्देशन पत्र दाखल करण्यासाठी २३ डिसेंबर २०२५ ते ३० डिसेंबर २०२५ पर्यंत कालावधी देण्यात आला असून पारंपरिक (ऑफलाईन) स्वरूपात नामनिर्देशन पत्र स्वीकारले जाणार आहे. प्राप्त नामनिर्देशन पत्रांची छाननी ३१ डिसेंबर २०२५ रोजी होणार असून उमेदवारी माघारीसाठी २ जानेवारी २०२६ ही तारीख निश्चित करण्यात आली आहे. चिन्ह वाटप आणि अंतिम उमेदवारांची यादी ३ जानेवारी २०२६ रोजी प्रसिद्ध केली जाणार आहे. महापालिका सार्वत्रिक निवडणुकीसाठी १५ जानेवारी २०२६ रोजी प्रत्यक्ष मतदान प्रक्रिया पार पडणार आहे. तर १६ जानेवारी २०२६ रोजी मतमोजणी होणार आहे. निवडणुकीसाठी ईव्हीएमचा वापर केला जाणार आहे.

### 32 प्रभाग 128 जागा

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेसाठी बहुसदस्यीय पद्धतीने निवडणूक राबवली जाणार असून चार सदस्यीय प्रभागरचना असणार आहे. एकूण ३२ प्रभागांमधून १२८ जागांसाठीची निवडणूक आहे. प्रत्येक उमेदवारासाठी १३ लाख रुपये इतकी खर्चाची मर्यादा निश्चित करण्यात आली आहे. प्रत्येक मतदाराला ४ मते देण्याचा अधिकार असणार आहे. महापालिका कार्यक्षेत्रात एकूण मतदारांची संख्या सुमारे १७ लाख १३ हजार ८९१ इतकी आहे. यामध्ये पुरुष मतदारांची संख्या ९ लाख ५ हजार ७२८ तर स्त्री मतदारांची संख्या ८ लाख ७ हजार ९६६ इतकी आहे. तर इतर मतदारांची संख्या १९७ इतकी आहे. निवडणुकीसाठी २ हजार ४४ मतदान केंद्रे निश्चित करण्यात आली आहेत. निवडणुकीसाठी ८ निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांची नियुक्ती करण्यात आली आहे.

### निवडणूक निर्णय अधिकारी कार्यालयांची ठिकाणे निश्चित

निवडणूक निर्णय अधिकारी कार्यालयांची ठिकाणे देखील निश्चित करण्यात आली आहेत. यामध्ये स्थानिक संस्था कर कार्यालय, हेडगेवार भवन, प्राधिकरण, निगडी, पुणे येथे प्रभाग क्रमांक १०, १४, १५ व १९ करिता निवडणूक निर्णय अधिकारी कार्यालय स्थापित करण्यात आले आहे. प्रभाग क्रमांक १६, १७, १८ व २२ करिता ब क्षेत्रीय कार्यालय, लिंक रोड, एल्प्रो मॉलच्या मागे, चिंचवडगाव येथे निवडणूक निर्णय अधिकारी कार्यालय असणार आहे. प्रभाग क्रमांक २, ६, ८ व ९ करिता क क्षेत्रीय कार्यालय, पॉलिग्रास हॉकी स्टेडियमजवळ, एमआयडीसी, भोसरी येथे तर प्रभाग क्रमांक २५, २६, २८ व २९ करिता ड क्षेत्रीय कार्यालय, औंध-रावेत बीआरटी रोड, रहाटणे येथे निवडणूक निर्णय अधिकारी कार्यालय असणार आहे. प्रभाग क्रमांक ३, ४, ५ व ७ करिता कबड्डी प्रशिक्षण संकुल, अंकुशराव लांडगे नाट्यगृहाच्या मागे, भोसरी येथे तर प्रभाग क्रमांक १, ११, १२ व १३ करिता सेक्टर १७/१९, स्पाईन रोड शेजारी, घरकुल चिखली टाउन हॉल येथे व प्रभाग क्रमांक २१, २३, २४ व २७ साठी ग क्षेत्रीय कार्यालय, वेंगसरकर अकादमीच्या मागे, थेरगाव येथे आणि प्रभाग क्रमांक २०, ३०, ३१ व ३२ करिता पिंपरी चिंचवड बॅडमिंटन हॉल, पी.डब्ल्यू.डी. मैदान, सांगवी येथे निवडणूक निर्णय अधिकारी कार्यालय स्थापित करण्यात आले आहे.

> “ महापालिका सार्वत्रिक निवडणुकांसाठी आदर्श आचारसंहिता लागू झाली आहे. आदर्श आचारसंहितेचा भंग होणार नाही याची सर्वांनी दक्षता घ्यावी. आदर्श आचारसंहितेचे काटेकोरपणे पालन व्हावे, याकरिता महापालिकेसह सर्व प्रशासकीय यंत्रणांना आदेश देण्यात आले आहेत. मतदान जनजागृती कार्यक्रम देखील महापालिकेच्या वतीने सुरू करण्यात आला असून सर्व पात्र मतदारांनी प्रत्यक्ष मतदान करावे, याकरिता जास्तीतजास्त प्रयत्न करण्यासाठी स्वीप मोहीम व्यापक करण्यात आली आहे
> **-श्रावण हर्डीकर,** महापालिका आयुक्त तथा निवडणूक अधिकारी

# पिंपरी-चिंचवडमध्ये “विकासाभिमुख हिंदुत्व” जागृती अभियान

## भाजपा आमदार महेश लांडगे यांचा पुढाकार; ‘स्टॅच्यू ऑफ हिंदभूषण’ गौरव रथातून जनजागृती

। पिंपरी चिंचवड ।
प्रतिनिधी : महाईन्यूज

**देव-देश-धर्म आणि शाश्वत विकास यांचा समन्वय साधणारे “विकासाभिमुख हिंदुत्व जागृती अभियान” हे अभियान पिंपरी-चिंचवडमध्ये राबवण्यात येत आहे. अभियानची सुरूवात भोसरी विधानसभा मतदारसंघात होणार असून, दि. 16 ते 25 डिसेंबरदरम्यान हा जागर होत आहे. सलग 10 दिवस चालणाऱ्या या अभियानात भोसरीतील 12 प्रभागांमध्ये विकासाभिमुख हिंदुत्वाचा संदेश घराघरांत पोहोचवला जाणार आहे.**




भारतीय जनता पार्टीचे आमदार महेश लांडगे यांची ही संकल्पना असून, या अभियानाचे मुख्य आकर्षण “स्टॅच्यू ऑफ हिंदुभूषण” गौरव रथ आहे. धर्मवीर छत्रपती संभाजी महाराज यांच्या स्वागतासाठी हा रथ विविध प्रभागांतून प्रवास करणार आहे. हिंदुत्व, शौर्य आणि भारतीय संस्कृतीचा जागर घडवणारा हा सोहळा ऐतिहासिक ठरणार असून, विकास आणि हिंदुत्व यांची सांगड घालणारे देशातील पहिले अभियान म्हणून याकडे पाहिले जात आहे.

मोशी येथील बोऱ्हाडेवाडी परिसरात उभारण्यात ये तअसलेले जगातील सर्वात उंच धर्मवीर छत्रपती संभाजी महाराज यांचे शिल्प म्हणजेच “स्टॅच्यू ऑफ हिंदुभूषण” हे पिंपरी-चिंचवड शहराची नवी ओळख ठरत असून, शिव-शंभूप्रेमींसाठी ते एक प्रेरणास्थान आणि शक्तीस्थळ बनले आहे.या अभियानामागील भूमिका स्पष्ट करताना, हिंदवी स्वराज्यांचे संस्थापक छत्रपती शिवाजी महाराज, धर्मवीर छत्रपती संभाजी महाराज आणि स्वातंत्र्यवीर सावरकर यांच्या सर्वसमावेशक हिंदुत्वाच्या विचारांची आजच्या काळात नितांत गरज असल्याचे अधोरेखित करण्यात आले. देव-देश-धर्म आणि विकास या चारही घटकांचा समतोल साधल्यास विकसित राष्ट्र ही संकल्पना प्रत्यक्षात साकार होऊ शकते, असा विश्वास व्यक्त करण्यात आला.

### संघटनात्मक बळावर जनजागृती

आगामी महापालिका निवडणुकीच्या निमित्ताने पन्ना प्रमुख ते प्रभाग अध्यक्षांपर्यंतच्या संघटनात्मक रचनेच्या माध्यमातून घराघरांत संपर्क साधण्यात येणार असून, नागरिकांशी थेट संवाद साधला जाणार आहे. पक्षाची संघटनशक्ती अधिक मजबूत करण्याचा हा प्रयत्न केला जात आहे. विशेष म्हणजे, मतदार संघातील प्रत्येक गावातील ग्रामदैवताचे आशिर्वाद घेवून अभियान सुरू होईल. त्यानंतर पालक-विद्यार्थी संवाद, शाळांमध्ये सोयी-सुविधा पाहणी, प्रभागातील उच्चशिक्षीत तज्ञ-डॉक्टर-सीए यांच्याची ‘चाय पे चर्चा’, महिला बचतगट सदस्यांची चर्चा, दुपारी रथ यात्रा, रॅली, महाआरती आणि सांगता सभा असे सलग 10 दिवस 12 प्रभागांमध्ये अभियान राबवण्यात येत आहे.

> “ हिंदुत्व ही केवळ ओळख नसून ती आपल्या संस्कृतीची, मूल्यांची आणि राष्ट्रनिर्मितीची शक्ती आहे. विकासाशिवाय हिंदुत्व अपूर्ण आहे आणि हिंदुत्वाशिवाय विकास दिशाहीन ठरतो. पिंपरी-चिंचवडला विकास आणि संस्कृती यांचा समतोल साधणारे आदर्श शहर बनवण्यासाठी हे अभियान जनआंदोलन म्हणून राबवले जाईल. राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, भाजपा प्रदेशाध्यक्ष रविंद्र चव्हाण यांच्या नेतृत्त्वात उच्च व तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली शहरात लोकसंपर्क अभियान राबवण्याच्या सूचना आहेत. त्याअनुशंगाने “विकासाभिमूख हिंदुत्व जागृती अभियान” राबवतो आहेत. आपल्या भावी पिढ्यांसाठी, शहराच्या प्रगतीसाठी पिंपरी-चिंचवडकरांनी या अभियानात सक्रीय सहभागी व्हावे, असे आवाहन करतो.
> **-महेश लांडगे,** आमदार, भाजपा, पिंपरी-चिंचवड, पुणे.




# मंथन व्हावे सर्वसामान्यांच्या प्रश्नांवर

**देशासमोर आज अनेक गंभीर आव्हाने उभी आहेत, ज्यांचा सामना करण्यासाठी राजकीय इच्छाशक्ती आणि रचनात्मक दृष्टिकोन आवश्यक आहे. बेरोजगारी ही एक मोठी समस्या आहे. लाखो तरुण शिक्षित असूनही रोजगाराच्या अभावाने निराशेच्या गर्तेत अडकले आहेत. महागाईने सर्वसामान्यांच्या खिशाला कात्री लावली आहे, ज्यामुळे दैनंदिन जीवन कठीण झाले आहे.**

भ्रष्टाचार तर व्यवस्थेच्या मुळाशी पोखरतो आहे सरकारी योजनांमधील गैरव्यवहार, निविदा प्रक्रियेतील अनियमितता आणि प्रशासकीय अपारदर्शकता यामुळे जनतेचा विश्वास उडतो. या प्रश्नांवर संसदेत गंभीर मंथन व्हावे, उपाययोजना आखल्या जाव्यात, अशी अपेक्षा जनतेला आहे.भारत ही जगातील सर्वात मोठी लोकशाही आहे, जिथे जनतेच्या आवाजाला सर्वोच्च स्थान आहे. मात्र, आज देशाच्या संसदेत आणि सार्वजनिक पटलावर ज्या विषयांवर चर्चा आणि वादविवाद होत आहेत, त्यांची दिशा लोकशाहीच्या मूळ उद्देशापासून भरकटल्यासारखी दिसते.देशातील मुळ मुद्दे प्रस्थापित पक्षांच्या अजेंड्यावर नाहीत त्यामुळे राजकारणाची दिशा भरकटलेली आहे. लोकशाहीचा मूलभूत उद्देश हा जनसामान्यांच्या कल्याणासाठी असतो – त्यांच्या



मूलभूत गरजा पूर्ण करणे, समानता प्रस्थापित करणे आणि विकासाची प्रक्रिया सर्वसमावेशक बनवणे. परंतु, सद्यःस्थितीत राजकीय चर्चा ही केवळ निवडणुकीच्या विजयासाठीची रणनीती बनली आहे. बेरोजगारी, महागाई आणि भ्रष्टाचार यांसारखे ज्वलंत प्रश्न बाजूला सारले जात आहेत, तर अनावश्यक भावनिक मुद्द्यांना प्राधान्य दिले जात आहे. हे चित्र केवळ चिंताजनक नाही, तर लोकशाहीच्या भविष्यासाठी धोकादायक आहे.

देशासमोर आज अनेक गंभीर आव्हाने उभी आहेत, ज्यांचा सामना करण्यासाठी राजकीय इच्छाशक्ती आणि रचनात्मक दृष्टिकोन आवश्यक आहे. बेरोजगारी ही एक मोठी समस्या आहे. लाखो तरुण शिक्षित असूनही रोजगाराच्या अभावाने निराशेच्या गर्तेत अडकले आहेत. महागाईने सर्वसामान्यांच्या खिशाला कात्री लावली आहे, ज्यामुळे दैनंदिन जीवन कठीण झाले आहे. भ्रष्टाचार तर व्यवस्थेच्या मुळाशी पोखरतो आहे सरकारी योजनांमधील गैरव्यवहार, निविदा प्रक्रियेतील अनियमितता आणि प्रशासकीय अपारदर्शकता यामुळे जनतेचा विश्वास उडतो. या प्रश्नांवर संसदेत गंभीर मंथन व्हावे, उपाययोजना आखल्या जाव्यात, अशी अपेक्षा जनतेला आहे. मात्र, राजकीय पक्षांचा कल हा निवडणुकीत विजय मिळवण्यासाठी भावनिक मुद्द्यांवर केंद्रित होताना दिसतो. धार्मिक ध्रुवीकरण, वैयक्तिक आरोप-प्रत्यारोप आणि क्षुल्लक वाद हे चर्चेचे केंद्र बनले आहेत, ज्यामुळे खरे प्रश्न 'नॉन-इश्यू' ठरतात. या दिशाहीन राजकारणाचे एक प्रमुख उदाहरण म्हणजे शेतकऱ्यांच्या समस्या. देशातील बहुसंख्य लोकसंख्या शेतीवर अवलंबून आहे, तरीही शेतकऱ्यांना कृषी मालाला योग्य भाव मिळत नाही. कर्जबाजारीपणा, दुष्काळ आणि अतिवृष्टी यामुळे शेतकरी आत्महत्या करत आहेत. रुपयाचे अवमूल्यन ही आणखी एक गंभीर आर्थिक समस्या आहे, ज्यामुळे आयात महाग होत आहे आणि अर्थव्यवस्था ताणली जात आहे. दुसरीकडे, शिक्षण आणि आरोग्याच्या क्षेत्रात शासकीय यंत्रणा अपुऱ्या पडत आहेत. ग्रामीण भागात शाळा आणि रुग्णालयांची कमतरता आहे, ज्यामुळे लाखो लोक मूलभूत सेवांपासून वंचित आहेत. हे सर्व प्रश्न संसद आणि मिडियाच्या चर्चेचे केंद्र असावेत, पण दुर्दैवाने ते नाहीत

मिडियाची भूमिका यात महत्त्वाची आहे, पण तीही निराशाजनक आहे. देशातील मिडियाचा मोठा भाग आता गंभीर राष्ट्रीय प्रश्नांवर चर्चा करण्याऐवजी वैयक्तिक चिखलफेक आणि राजकीय पक्षांच्या क्षुल्लक वादांना प्राधान्य देताना दिसतो. टीव्हीवरील चर्चासत्रे अनेकदा धोरणात्मक विषयांवर आधारित नसून, केवळ भावनिक आणि ध्रुवीकरण करणाऱ्या मुद्द्यांभोवती फिरतात. टीआरपीच्या मागे लागून मिडिया जनतेच्या खऱ्या समस्या दुर्लक्षित करतो, ज्यामुळे राजकारणाचे स्वरूप अनावश्यक दिशाहीन बनते.

## प्रासंगिक »

### बालेकिल्ल्यात

***संस्थांच्या निवडणुकीच्या निकालांनी सत्ताधारी डाव्या लोकशाही आघाडीला (एलडीएफ) मोठा धक्का दिला आहे.***

भाजपने गेल्या वर्षी दक्षिणेकडील राज्यात लोकसभेची पहिली जागा जिंकली होती. आतापर्यंत तेथे त्यांचा फक्त एकच आमदार आहे. भाजपच्या नेतृत्वाखालील 'एनडीए' ने केरळची राजधानी तिरुअनंतपूरममधील १०१ सदस्यीय महानगरपालिकेत ५० जागा जिंकल्या. हा भाजपचा पहिलाच मोठा विजय झाला. तिरुअनंतपूरम लोकसभा मतदारसंघातून काँग्रेसचे शशी थरूर निवडून आले आहेत. ते सध्या काँग्रेसपासून दूर आहेत आणि त्यांची भाजपची जवळीक वाढली आहे. तिरुअनंतपूरम ही केरळची राजधानी. गेल्या साडेचार दशकापासून या महापालिकेत डाव्यांची सत्ता होती. ही सत्ता उलथवून टाकण्यात भाजपला यश आले. ही महानगरपालिका डाव्यांचा बालेकिल्ला मानली जात होती. शंभर सदस्यांच्या महानगरपालिकेत 'एनडीए'ने ५०, 'एलडीएफ'ने २९ आणि 'यूडीएफ'ने १९ जागा जिंकल्या, तर उर्वरित दोन जागा अपक्ष उमेदवारांना मिळाल्या.

महात्मा गांधींनी राजकारणाला नीतिमत्तेची जोड असावी, असे ठामपणे प्रतिपादन केले होते. या तत्त्वावर शिवराज पाटील-चाकूरकर यांनी आपल्या संपूर्ण सार्वजनिक जीवनात गांधीवादी विचारांचे जिवंत उदाहरण साकार केले. त्यांनी सत्याशी कधीही तडजोड केली नाही. ते कायम सर्वप्रकारच्या प्रलोभनांपासून दूर राहिले.

# मूल्याधिष्ठित राजकारणाचा अध्याय

मराठवाडा, महाराष्ट्र आणि देशाच्या राजकीय इतिहासात काही व्यक्तिमत्त्वे अशी असतात की, ती केवळ सत्तेच्या शिखरावर पोहोचल्यामुळे नव्हे, तर चारित्र्य, नीतिमत्ता, संयम आणि मूल्यनिष्ठ आचरणामुळे अढळ स्थान प्राप्त करतात. अशाच दुर्मीळ, सुसंस्कृत आणि प्रेरणादायी नेतृत्वामध्ये शिवराज पाटील-चाकूरकर यांचे नाव आदराने आणि अभिमानाने घेतले जाते. स्वातंत्र्योत्तर भारताच्या राजकारणात चार ते साडेचार दशके सक्रिय राहूनही ज्यांनी आपले सार्वजनिक जीवन पूर्णतः निष्कलंक ठेवले, असा नेता विरळाच. आजच्या गोंधळलेल्या, सवंग आणि आरोप-प्रत्यारोपांनी भरलेल्या राजकारणाच्या दीपस्तंभासारखे उजळून दिसते. मराठवाड्याच्या मातीत जन्मलेले शिवराज पाटील चाकूरकर हे केवळ लातूरचे लोकप्रतिनिधी नव्हते, तर महाराष्ट्राचे आणि संपूर्ण देशाचे वैचारिक वैभव होते. स्वातंत्र्योत्तर



काळात महाराष्ट्राचे केंद्रात समर्थपणे प्रतिनिधित्व करणाऱ्या मोजक्या नेत्यांमध्ये त्यांचे नाव अग्रभागी घेतले जाते. १९६७ पासून राजकारणात सक्रिय झालेल्या शिवराज पाटील चाकूरकर यांनी सातत्याने जनतेचा विश्वास संपादन केला. नगरसेवकापासून सुरू झालेला त्यांचा प्रवास लोकसभा सदस्य, केंद्रीय मंत्री, लोकसभा सभापती आणि अखेरीस देशाचे गृहमंत्रिपद अशा सर्वोच्च टप्प्यांपर्यंत पोहोचला. १९८० मध्ये पंतप्रधान श्रीमती इंदिरा गांधी यांनी त्यांच्या विद्वत्तेवर, प्रामाणिकपणावर आणि कार्यक्षमतेवर विश्वास ठेवून त्यांची केंद्रीय मंत्रिमंडळात निवड केली. ही

निवड अनेक अर्थांनी फलदायी ठरली. पुढील काळात त्यांनी विविध केंद्रीय मंत्रिपदे भूषविली. लोकसभा सभापती म्हणून कार्य करताना त्यांनी संसदीय परंपरांना प्रतिष्ठा मिळवून दिली. २००४ च्या लोकसभा निवडणुकीतील पराभव हा त्यांच्या राजकीय जीवनातील एक महत्त्वाचा टप्पा ठरला. सतत विजयाच्या शिखरावर असलेल्या या नेत्याने पराभव अत्यंत संयमाने स्वीकारला. देशाचे गृहमंत्रिपद त्यांना लाभणे, हे मराठवाड्याचे आणि महाराष्ट्राचे महाभाग्यच मानावे लागेल. गृहमंत्रिपदाच्या काळात देशासमोर दहशतवादासारखी गंभीर आणि आव्हानात्मक परिस्थिती उभी होती. मालेगाव, दिल्ली, अहमदाबाद, जयपूर यांसारख्या ठिकाणी झालेल्या दहशतवादी हल्ल्यांच्या पार्श्वभूमीवर पाश त्यांनी परिस्थिती हाताळताना धैर्य, संयम आणि संवेदनशीलतेचे दर्शन घडवले.

## ।। अभंगवाणी ।।



आजिवरी तुम्हां आम्हां नेणपण ।
कौतुकें खेळणें संग होता ॥१॥

आतां अनावर जालें अगुणाची ।
करूं नये तें चि करीं सुखें ॥२॥

**- संत तुकाराम**

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक-संपादक श्री. अधिकराव दिवे- पाटील** यांनी छत्रपती शिवाजी महाराज गोल मंडई, गाळा क्र. ७९/८०, संत तुकारामनगर, पिंपरी, पुणे- 411018 येथे पुणे विभागीय कार्यालयामधून प्रसिद्ध केले आहे. एमएसएमई नोंदणी क्रमांक : MH-26-0158827. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक-संपादक सहमत असतीलच असे नाही.
**कार्यकारी संपादक : वैष्णव जाधव । मुख्य कार्यकारी संपादक : सुनील आढाव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) विशेष सूचना: हा अंक कोणत्याची प्रकारच्या प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.

## निसर्गाची हानी करण्याची वृत्ती

## सह्याद्री वाचवा मोहिमेतंर्गत पर्यावरण प्रेमींनी दिला इशारा

# वृक्षतोडप्रकरणी उच्च न्यायालयात जाणार!

। मुंबई ।

**प्रतिनिधी : महाईन्यूज**

**नाशिकमधील पंचवटी-तपोवान येथील साधू ग्रामा प्रकल्पासाठी १८२५ वृक्ष तोड थांबवणे आवश्यक आहे जर ती नाही थांबवली तर मुंबई उच्च न्यायालयात जाण्याचा इशारा सह्याद्री वाचवा मोहीमेचे पर्यावरणप्रेमी कार्यकर्ते सुशांत मोरे यांनी केंद्रीय वन पर्यावरण व हवामान बदल मंत्री भूपेंद्र यादव, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना निवेदनाव्दारे दिला आहे.**

## सार्वजनिक निधीचा अपव्यय



## फडणवीस यांना निवेदन

आणि एका झाडाच्या बदल्यात दहा झाडे लावण्याचे स्वतंत्र टेंडर हा सर्व प्रकार सार्वजनिक निधीचा अपव्यय, कुंभमेळ्याच्या नावाखाली तिजोरी भरण्याचा संशय, आणि निसर्गाची हानी करण्याची वृत्ती दर्शवतो.सह्याद्री वाचवा मोहिमेअंतर्गत नाशिकमधील पंचवटी-तपोवन हे धार्मिक, ऐतिहासिक आणि पर्यावरणीयदृष्ट्या अत्यंत महत्त्वाचे आहे.

निवेदनात म्हटले आहे, महाराष्ट्रात याआधी अनेक कुंभमेळे पार पडले. तेव्हा कुठल्याही प्रशासकीय संस्थेला हजारो झाडांची कत्तल करण्याची गरज भासली नाही. उलट, त्या नियोजनाची जागतिक पातळीवर प्रशंसा झाली. मग आता अचानक तपोवनच का? जेव्हा नाशिकमध्ये हजारो एकर रिकाम्या किंवा उपलब्ध जागा आहेत, तेव्हा तपोवनच्या हृदयातच साधूग्राम उभारण्याचा हट्ट का? याबाबत प्रशासनाकडून कोणताही तर्कसंगत आधार दिला जात नाही. झाडतोडीसाठी वेगवेगळे टेंडर साधूग्रामसाठी वेगळे टेंडर, आणि एका झाडाच्या बदल्यात दहा झाडे लावण्याचे स्वतंत्र टेंडर हा सर्व प्रकार सार्वजनिक निधीचा अपव्यय, कुंभमेळ्याच्या नावाखाली तिजोरी भरण्याचा संशय, आणि निसर्गाची हानी करण्याची वृत्ती दर्शवतो. सह्याद्री वाचवा मोहिमेअंतर्गत नाशिकमधील पंचवटी-तपोवन हे धार्मिक, ऐतिहासिक आणि पर्यावरणीयदृष्ट्या अत्यंत महत्त्वाचे आहे.येथील कुंभमेळ्यासाठी साधू ग्राम प्रकल्पासाठी सुमारे १८२५ प्रौढ झाडे तोडण्याचा प्रस्ताव आहे. तो तत्काळ रद्द करावा. इतक्या मोठ्या संख्येने झाडे कापल्याने हवेची गुणवत्ता, स्थानिक जैवविविधता, तापमान नियमन आणि एकूणच पर्यावरणीय संतुलनावर गंभीर परिणाम होईल.

ही झाडे देखील महत्त्वपूर्ण अधिवास म्हणून काम करतात. प्रकल्पासाठी कोणतेही झाड तोडू नये. या निवेदनाच्या प्रती राज्यपाल, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, वनमंत्री गणेश नाईक, मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई, प्रधान मुख्य वनसंरक्षक (वनबल प्रमुख) महाराष्ट्र राज्य, प्रधान मुख्य वनसंरक्षक, नागपूर, अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक, पश्चिम प्रदेश बोरिवली मुंबई, जिल्हाधिकारी, नाशिक यांना पाठवण्यात आल्या आहेत. या संपूर्ण प्रक्रियेची स्वायत्त चौकशी करून टेंडर प्रक्रियेतील संभाव्य गैरव्यवहार तपासावेत. निसर्ग, धार्मिक वारसा आणि पर्यावरणीय संतुलन जपणारे नियोजन पुन्हा तयार करावे. कुंभमेळा आयोजनात पारदर्शकतेसाठी आपण स्वतः लक्ष घालावे, अशा मागण्या मोरे यांनी केल्या आहेत. नाशिकच्या पर्यावरणीय वारशाचे आणि त्याच्या आध्यात्मिक पर्यावरणाचे रक्षण करण्यासाठी आपला वेळेवर हस्तक्षेप व आपली पर्यावरणीय हिताची भूमिका अत्यंत महत्त्वाची आहे. अन्यथा महाराष्ट्र राज्य सरकारच्या या निर्णयाविरोधात मला सह्याद्री वाचवा मोहिमेअंतर्गत मुंबई उच्च न्यायालयात धाव घ्यावी लागेल,

असा इशाराही मोरे यानी निवेदनाव्दारे दिला आहे. नाशिकमधील पंचवटी-तपोवान येथील साधू ग्रामा प्रकल्पासाठी १८२५ वृक्ष तोड थांबवणे आवश्यक आहे जर ती नाही थांबवली तर मुंबई उच्च न्यायालयात जाण्याचा इशारा सह्याद्री वाचवा मोहीमेचे पर्यावरणप्रेमी कार्यकर्ते सुशांत मोरे यांनी केंद्रीय वन पर्यावरण व हवामान बदल मंत्री भूपेंद्र यादव, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना निवेदनाव्दारे दिला आहे. निवेदनात म्हटले आहे, महाराष्ट्रात याआधी अनेक कुंभमेळे पार पडले. तेव्हा कुठल्याही प्रशासकीय संस्थेला हजारो झाडांची कत्तल करण्याची गरज भासली नाही. उलट, त्या नियोजनाची जागतिक पातळीवर प्रशंसा झाली. मग आता अचानक तपोवनच का? जेव्हा नाशिकमध्ये हजारो एकर रिकाम्या किंवा उपलब्ध जागा आहेत, तेव्हा तपोवनच्या हृदयातच साधूग्राम उभारण्याचा हट्ट का? याबाबत प्रशासनाकडून कोणताही तर्कसंगत आधार दिला जात नाही.


# 18 विकासकांना नवी मुंबई पालिकेचा दणका!

## बांधकाम स्थगितीची नवी मुंबई पालिकेची कारवाई

। मुंबई ।

**प्रतिनिधी : महाईन्यूज**

**महानगरपालिका कार्यक्षेत्रात विविध ठिकाणी बांधकाम व पुनर्विकासाची कामे सुरु आहेत. या कामांमुळे होणारे ध्वनी प्रदूषण, वायू प्रदूषण व ब्लास्टिंगच्या अनुषंगाने प्राप्त होणा-या तक्रारींस अनुसरून मा. उच्च न्यायालय, मुंबई यांनी स्वतःहून दाखल करुन घेतलेली जनहित याचिका क्र.3/2023 मध्ये उच्च न्यायालयाने 11 डिसेंबर 2023 रोजी पारित केलेल्या आदेशानुसार वायू प्रदूषण कमी करण्याबाबत आदेश दिलेले आहेत.**



## ८५ पैकी १८ विकासकांना नोटीस

महानगरपालिका क्षेत्रातील सर्व विकासक, वास्तुविशारद यांची सर्व विभागांचे सहाय्यक आयुक्त तथा विभाग अधिकारी यांच्यासमवेत ध्वनी व वायू प्रदूषणास प्रतिबंध करणेकरिता जाहीर मानक कार्यप्रणालीचे पालन करणेबाबत सूचना करण्याकरिता 06 नोव्हेंबर 2025 रोजी बैठक आयोजित केली होती.

या अनुषंगाने महापालिका आयुक्त डॉ.कैलास शिंदे यांच्या मान्यतेने 1 ऑगस्ट 2024 रोजी परिपत्रक निर्गमित करण्यात आलेले आहे.सध्या हिवाळी कालावधीत वातावरणातील वाढलेले धूळ आणि धुळीचे प्रमाण लक्षात घेत त्यादृष्टीने विविध उपाययोजना करताना बांधकाम साईट्सवर प्रदूषण प्रतिबंधात्मक नियमांचे पालन केल जात असल्याबाबत प्रत्यक्ष साईट्सला भेट देऊन तपासणी करण्याचे निर्देश आयुक्तांनी दिले होते. त्यानुसार मानक कार्यप्रणालीची प्रत्यक्ष जागेवर अंमलबजावणी योग्य रितीने होत असलेबाबतची खातरजमा करणेकरिता नगररचना विभागामार्फत अभियंत्यांची विभागनिहाय पथके तयार करण्यात आली होती. या अभियंत्यांनी बांधकाम सुरू असलेल्या प्रकल्पांच्या ठिकाणी जाऊन पाहणी केली असता एकूण 85 प्रकल्पांच्या ठिकाणी सदर कार्यप्रणालीचे पूर्णपणे पालन होत नसल्याचे निदर्शनास आले होते. त्यानुसार 26 नोव्हेंबर 2025 रोजीच्या पत्रान्वये सदर 85 प्रकल्पांच्या विकासकांना अधिनियमातील तरतुदीनुसार दंडात्मक कार्यवाही करणेबाबत तसेच उक्त मानक कार्यप्रणालीतील बाबींची त्वरीत पूर्तता करुन पुढील 7 दिवसात आपला खुलासा सादर करणेबाबत सूचित करण्यात आले होते. अन्यथा त्यांच्या भूखंडावर देण्यात आलेल्या बांधकाम परवानगीस काम स्थगिती आदेश देण्याबाबत कार्यवाही करण्यात येईल, असे कळविण्यात आले होते.एकूण 85 प्रकल्पांपैकी 18 प्रकल्पांच्या विकासकांनी मानक कार्यप्रणालीतील प्रमुख बाबींची पूर्तता न केल्याचे निदर्शनास आल्याने संबंधित प्रकल्पांना महापालिका आयुक्त यांच्या मान्यतेने बांधकाम स्थगिती आदेश देण्यात आलेले आहेत. नवी मुंबईतील पर्यावरणाविषयी जागरूक राहत वायूप्रदूषण प्रतिबंधासाठी ठोस पावले उचलली जात असून 18 बांधकामांना दिलेले स्थगिती आदेश हा त्याच उपाययोजनांचा एक भाग आहे.

**विरोधक संतापले** सार्वजनिक कार्यक्रमात महिलेचा हिजाब काढला

# नितीश कुमार वादाच्या भोवऱ्यात!

। नवी दिल्ली ।

वृत्तसंस्था : महाईन्यूज

**बिहारचे मुख्यमंत्री नितीश कुमार (NITISH KUMAR) यांचा एक व्हिडिओ सध्या सोशल मीडियावर मोठ्या प्रमाणात व्हायरल होत आहे. या व्हिडिओमध्ये नितीश कुमार एका सार्वजनिक कार्यक्रमाच्या मंचावर एका मुस्लिम महिलेच्या चेहऱ्यावरून हिजाब काढताना दिसत आहेत. हा व्हिडिओ समोर आल्यानंतर अनेक स्तरांतून संताप व्यक्त केला जात आहे.**

## नितीश कुमारांच्या कृतीने नवा वाद!




## महिला डॉक्टरचा हिजाब काढला

बिहारची राजधानी पाटणा येथे घडली. येथे मुख्यमंत्री नितीश कुमार १२८३ आयुष डॉक्टरांना (आयुर्वेदिक, होमिओपॅथिक आणि युनानी) नियुक्ती पत्र वितरित करत होते. या समारंभाला उपमुख्यमंत्री सम्राट चौधरी, विजय कुमार सिन्हा आणि आरोग्य मंत्री मंगल पांडे हे देखील उपस्थित होते.समारंभादरम्यान नवनियुक्त आयुष डॉक्टरांना एकेक करून नियुक्ती पत्र दिले जात होते.

व्हायरल व्हिडिओमध्ये स्पष्टपणे दिसत आहे की, मुख्यमंत्री नितीश कुमार नियुक्ती पत्र (APPOINTMENT LETTER) देत असताना एका मुस्लिम महिला डॉक्टरच्या चेहऱ्यावरून हिजाब काढत आहेत. मंचावर उपस्थित असलेले उपमुख्यमंत्री सम्राट चौधरी यांनी नितीश कुमार यांना थांबवण्याचा प्रयत्न केला, परंतु तोपर्यंत उशीर झाला होता आणि नितीश कुमार यांनी त्या महिला डॉक्टरच्या चेहऱ्यावरील हिजाब काढला होता.ही घटना सोमवारची (१५ डिसेंबर २०२५) असून बिहारची राजधानी पाटणा येथे घडली. येथे मुख्यमंत्री नितीश कुमार १२८३ आयुष डॉक्टरांना (आयुर्वेदिक, होमिओपॅथिक आणि युनानी) नियुक्ती पत्र वितरित करत होते. या समारंभाला उपमुख्यमंत्री सम्राट चौधरी, विजय कुमार सिन्हा आणि आरोग्य मंत्री मंगल पांडे हे देखील उपस्थित होते. समारंभादरम्यान नवनियुक्त आयुष डॉक्टरांना एकेक करून नियुक्ती पत्र दिले जात होते. याच क्रमाने डॉ. नुसरत परवीन यांची पाळी आली, ज्यांनी हिजाब परिधान केला होता. त्या मंचावर पोहोचल्यावर मुख्यमंत्री नितीश कुमार यांनी सर्वात आधी त्यांना नियुक्ती पत्र दिले.

मात्र, त्यानंतर लगेचच नितीश कुमार यांनी नुसरत परवीन यांचा हिजाब ओढून काढला.लालू यादव यांच्या राष्ट्रीय जनता दलाने (RJD) या घटनेवर प्रश्नचिन्ह उपस्थित केले आहे. राजदने सोशल मीडिया प्लॅटफॉर्म 'एक्स' (पूर्वीचे ट्विटर) वर व्हिडिओ पोस्ट करत लिहिले, "नितीशजींना हे काय झाले आहे? त्यांची मानसिक स्थिती दयनीय झाली आहे की नितीश बाबू आता १००% संघी झाले आहेत?" हा व्हिडिओ सध्या सोशल मीडियावर वेगाने प्रसारित होत आहे आणि त्यामुळे मोठा राजकीय गदारोळ होण्याची शक्यता आहे. यापूर्वी निवडणुकीच्या वेळी, नोव्हेंबरमध्येही नितीश कुमार यांचा असाच एक व्हिडिओ व्हायरल झाला होता. त्यावेळी खगड़िया येथील एका जाहीर सभेला संबोधित करण्यासाठी ते पोहोचले होते. मंचावर स्वागत करण्यासाठी आलेल्या एका महिलेला नितीश कुमार यांनी जबरदस्तीने फुलांचा हार घातला होता. तेव्हा तत्कालीन बिहार भाजपचे अध्यक्ष दिलीप जयस्वाल यांनी त्यांना रोखण्याचा प्रयत्न केला होता.बिहारचे मुख्यमंत्री नितीश कुमार (NITISH KUMAR) यांचा एक व्हिडिओ सध्या सोशल मीडियावर मोठ्या प्रमाणात व्हायरल होत आहे. या व्हिडिओमध्ये नितीश कुमार एका सार्वजनिक कार्यक्रमाच्या मंचावर एका मुस्लिम महिलेच्या चेहऱ्यावरून हिजाब काढताना दिसत आहेत. हा व्हिडिओ समोर आल्यानंतर अनेक स्तरांतून संताप व्यक्त केला जात आहे. व्हायरल व्हिडिओमध्ये स्पष्टपणे दिसत आहे की, मुख्यमंत्री नितीश कुमार नियुक्ती पत्र (APPOINTMENT LETTER) देत असताना एका मुस्लिम महिला डॉक्टरच्या चेहऱ्यावरून हिजाब काढत आहेत. मंचावर उपस्थित असलेले उपमुख्यमंत्री सम्राट चौधरी यांनी नितीश कुमार यांना थांबवण्याचा प्रयत्न केला, परंतु तोपर्यंत उशीर झाला होता आणि नितीश कुमार यांनी त्या महिला डॉक्टरच्या चेहऱ्यावरील हिजाब काढला होता.

# शत्रूंसाठी मोठी धोक्याची घंटा!

## भारताच्या ताफ्यात लवकरच दाखल होणार 3 घातक हेलिकॉप्टर्स

। नवी दिल्ली ।

वृत्तसंस्था : महाईन्यूज

**भारतीय सैन्याच्या हवाई युद्ध क्षमतेला बळकट करण्याच्या दिशेने एक महत्त्वाचे पाऊल टाकले जात आहे. अमेरिका लवकरच भारताला तीन AH-64E अपाचे अटॅक हेलिकॉप्टर्सची डिलिव्हरी करणार आहे. हा अपाचे ताफ्याचा अंतिम टप्पा असेल.**



## अपाचे हेलिकॉप्टर्स कधी येतील?

प्रचंड हेलिकॉप्टर खास करून चीनला लागून असलेल्या हिमालयाच्या सीमांसाठी डिझाइन केले गेले आहे आणि यात स्टील्थ, कवच आणि प्रगत नाईट अटॅक क्षमता आहेत.या अंतिम तुकडीसह, राजस्थानमधील जोधपूर येथे असलेल्या ४५१ आर्मी एव्हिएशन स्क्वाड्रनची सहा हेलिकॉप्टर असलेली युनिट पूर्णपणे कार्यान्वित होईल.

या अंतिम तुकडीसह, राजस्थानमधील जोधपूर येथे असलेल्या ४५१ आर्मी एव्हिएशन स्क्वाड्रनची सहा हेलिकॉप्टर असलेली युनिट पूर्णपणे कार्यान्वित होईल. पाकिस्तानच्या पश्चिम सीमेवरील भारतीय सेनेची ऑपरेशनल आणि स्ट्राइक क्षमता वाढवण्याचा मुख्य उद्देशाने अपाचे हेलिकॉप्टर तैनात करण्याची प्रक्रिया फेब्रुवारी २०२० मध्ये सुरू झाली होती. याच वर्षी, जुलै २०२५ मध्ये अपाचेची पहिली तुकडी अमेरिकेच्या ट्रान्सपोर्ट एअरक्राफ्टने हिंडन एअरबेस (गाझियाबाद) येथे पोहोचली होती. यापूर्वीही अपाचे हेलिकॉप्टर्स सोव्हिएत युनियनच्या अँटोनोव्ह कार्गो विमानाने भारतात आणले गेले आहेत.भारतीय सेना आणि अमेरिका यांच्यात फेब्रुवारी २०२० मध्ये सुमारे ₹ ५,६९१ कोटींचा संरक्षण करार झाला होता. या करारानुसार सेनेला एकूण सहा AH-64E अपाचे हेलिकॉप्टर मिळणे अपेक्षित होते. पुरवठा साखळीतील अडथळे, तांत्रिक अडचणी आणि जागतिक परिस्थितीमुळे डिलिव्हरीला बराच विलंब झाला. मूळ योजनेनुसार सर्व हेलिकॉप्टर्स २०२४ पर्यंत भारतात येणार होते, परंतु पहिली तुकडी जुलै २०२५ मध्ये पोहोचली.अंतिम तीन अपाचे हेलिकॉप्टर्स डिसेंबर २०२५ मध्ये भारतात येण्याची शक्यता आहे. त्यांची असेंबली आणि तांत्रिक तपासणी पूर्ण झाल्यानंतर त्यांना जोधपूर येथे पाठवले जाईल. सहाही हेलिकॉप्टर्सचा समावेश होताच, भारतीय सेनेची पहिली अपाचे अटॅक हेलिकॉप्टर स्क्वाड्रन पूर्णपणे ऑपरेशनल घोषित केली जाईल. जबरदस्त मारक क्षमतेमुळे अपाचे हेलिकॉप्टरला 'फ्लाइंग टँक' (FLYING TANK) म्हटले जाते. हे जगातील सर्वात प्रगत मल्टी-रोल कॉम्बॅट हेलिकॉप्टर्सपैकी एक आहे, जे अमेरिकेतील मेसा, ॲरिझोना येथे विकसित केले गेले आहे.भारतीय हवाई दलाकडेजे एअर डिफेन्स आणि डीप स्ट्राइक मिशनमध्ये वापरले जातात. अपाचेसोबतच, संरक्षण मंत्रालयाने मार्च २०२५ देखील करार केला आहे. पुढील पाच वर्षांमध्ये यांची डिलिव्हरी होईल.

## मोठ्या पडद्यावरही छाप

जय भानुशाली हा टेलिव्हिजन जगतातील एक प्रसिद्ध चेहरा आहे. त्याने छोट्या आणि मोठ्या पडद्यावरही आपली छाप सोडली आहे. अभिनेता अलिकडेच त्याची पत्नी माही विजसोबतच्या वैवाहिक अडचणींमुळे चर्चेत आला आहे. दरम्यान, एका व्हिडिओमध्ये जय आणि त्याची बिग बॉस १५ ची सह-स्पर्धक मैशा अय्यर एकत्र फिरताना दिसत आहेत. त्यांच्या डेटिंगच्या अटकळांनंतर, जयची मैत्रीण आरती सिंगने त्यांच्या नात्याबद्दल स्पष्टीकरण दिले.एका मीडिया आउटलेटने जय भानुशाली आणि मैशा एका कॉन्सर्टमध्ये असल्याचे व्हिडिओ शेअर केला आहे. व्हिडिओमध्ये मैशाला एक मिस्ट्री गर्ल म्हणून वर्णन केले आहे. दोघेही पारंपारिक पोशाखात कॉन्सर्टचा आनंद घेत असल्याचे दिसून आले. मैशाने पांढरा अनारकली सूट घातला होता, तर जयने सोनेरी भरतकाम असलेली गडद शेरवानी घातली होती. पत्नी माहीपासून घटस्फोटाच्या अफवांमध्ये बिग बॉस १५ च्या मैशासोबत जयचा व्हायरल व्हिडिओ प्रश्न उपस्थित करतो. आरती सिंगने या सगळ्यालाउत्तर दिले आहे.बिग बॉस १३ मध्ये दिसलेली आरती सिंगने जय आणि मैशाला पाठिंबा दिला. व्हायरल व्हिडिओवर बोलताना ती म्हणाली की मैशा ही जयची बहीण आहे. जय आणि मैशा बिग बॉस १५ मध्ये भेटले. त्यांच्यात घरात चांगली मैत्री निर्माण झाली, जी त्यांच्या बाहेर पडल्यानंतरही कायम राहिली. आरती सिंगचा भाऊ-बहिणीचे नाते असल्याचा दावा पूर्णपणे खरा आहे. रक्षाबंधनाच्या दिवशी जय आणि मैशा यांनी राखी बांधतानाचे स्वतःचे फोटो देखील शेअर केले. खोट्या अफवांना नकार देत आरतीने लिहिले, "तुम्ही लोक काहीही लिहा... ती त्याची राखी बहीण आहे... तुमच्या तथ्यांची पडताळणी करा. एक मोठा गेल्या काही काळापासून त्यांनी एकमेकांबद्दल पोस्ट केलेले नसल्याच्या लक्षात आल्यानंतर सोशल मीडियावर प्रश्न उपस्थित झाले.

## धुरंधर पाहून पाकिस्तानला लागली मिरची

बॉलीवूड स्टार रणवीर सिंग, संजय दत्त, अर्जुन रामपाल, अक्षय खन्ना आणि आर. माधवन यांची भूमिका असलेला "धुरंधर" हा चित्रपट सर्वत्र चर्चेत आहे. या चित्रपटाची चर्चा केवळ भारतातच नाही तर जगभरात होत आहे. चित्रपटाच्या कथेने शेजारील पाकिस्तानला संताप दिला आहे. सरकार आणि गुप्तचर संस्था दहशतवादाला कसे प्रोत्साहन देतात हे या चित्रपटात दाखवण्यात आले आहे. पाकिस्तानचा दावा आहे की पाकिस्तानच्या लियारी शहरावर आधारित हा चित्रपट खोट्या कथेवर आधारित आहे. त्याला प्रत्युत्तर म्हणून पाकिस्तानने "मेरा लियारी" या चित्रपटाची निर्मिती करण्याचा निर्णय घेतला आहे. धुरंधर" चित्रपटाच्या प्रदर्शनामुळे अस्वस्थ झालेल्या पाकिस्तानने असा दावा केला आहे की लियारीचे चित्रण खोटे आहे. तिथे हिंसाचार नाही. दरम्यान, पाकिस्तानच्या सिंध प्रांतातील मंत्री शरजील इनाम मेमन यांनी त्यांच्या सोशल मीडिया अकाउंटवर "मेरा लियारी" चित्रपटाची घोषणा केली. पाकिस्तानी मंत्र्यांनी सांगितले की "धुरंधर" हा भारतीय चित्रपट पाकिस्तानविरुद्ध, विशेषतः लियारीविरुद्ध नकारात्मक प्रचाराचे उदाहरण आहे. लियारी हे हिंसाचाराचे ठिकाण नाही, तर असे ठिकाण आहे जिथे संस्कृती, शांतता, प्रतिभा आणि संघर्षातून प्रगती ही उदाहरणे आहेत. म्हणूनच, "मेरा लियारी" नावाचा चित्रपट पुढील महिन्यात प्रदर्शित होणार आहे जो लियारीची खरी ओळख दाखवेल.

## सई लोकूरला कन्यारत्न



मराठी मनोरंजन विश्वातील लोकप्रिय अभिनेत्री सई लोकूर आई झाली आहे. गेल्या अनेक दिवसांपासुन सईचे प्रेग्नंसी फोटोशूट चर्चेत होते. आता नुकतंच सईने सोशल मीडियावर आई झाल्याची गुड न्यूज सर्वांसोबत शेअर केलीय. सईला कन्यारत्न प्राप्त झाले असून आज १७ फेब्रुवारीला सईने मुलीला जन्म दिलाय. बाळ सुदृढ, सुंदर असुन ती जन्माला येताच अनेकांचं तिला प्रेम मिळालंय. या काळात तुम्ही आमच्यावर जो प्रेमाचा वर्षाव केला आणि पाठिंबा दिला, त्याबद्दल मी ऋणी आहे. आम्ही खुप आनंदात आहे. आई - बाबा झालेले सई - तीर्थदीप. सई लोकूरच्या सोशल मीडिया टीमने पोस्ट केलीय की, "एका छोट्या चेहऱ्यावर देवाचा आशिर्वाद. आमच्या बाळाच्या आगमनाची घोषणा करताना आम्हाला खूप आनंद होत आहे. आई आणि बाळ दोघेही ठीक आहेत. सर्व प्रेम आणि शुभेच्छांसाठी धन्यवाद." अशी पोस्ट सईच्या सोशल मीडिया टीमने शेअर केलीय. सईला कन्यारत्न प्राप्त झाल्याबद्दल अनेक कलाकारांनी आणि तिच्या चाहत्यांनी कमेंटमध्ये तिचं अभिनंदन केलंय. दरम्यान सईला मुलगी झाल्याने तिचा काही दिवसांपुर्वीचा व्हिडीओ चर्चेत आलाय. सई लोकुरने सोशल मीडियावर डोहाळेजेवणाचा व्हिडीओ शेअर केला होता. त्यावेळी सईच्या समोर दोन वाट्या ठेवल्या होत्या.

## कभी खुशी कभी गम"ला 24 वर्षे पूर्ण

९० च्या दशकात अनेक कुटुंब आणि बहु-स्टारर चित्रपट प्रदर्शित झाले, परंतु काही चित्रपट जे एकेकाळी लोकांच्या मनात कोरले गेले होते, ते कधीही गेले नाहीत. असाच एक चित्रपट होता "कभी खुशी कभी गम", ज्यामध्ये कौटुंबिक प्रतिष्ठा, श्रीमंत आणि गरिबांच्या सीमा ओलांडणारे प्रेम आणि तीन पिढ्यांचा संगम दर्शविला गेला होता. आज, या चित्रपटाला २४ वर्षे पूर्ण झाली आहेत आणि अभिनेत्री काजोल आणि चित्रपट दिग्दर्शक करण जोहर यांनी सोशल मीडियावर आपला आनंद व्यक्त केला आहे.काजोलने तिच्या इंस्टाग्रामवर लिहिले, "सर्व अंजलीवासीयांना माझा मेसेज: तुमचे मन मोकळेपणाने आणि अभिमानाने बोलत राहा! राहुल नक्कीच कुठेतरी आहे, पण ट्रॅफिकमुळे तो कदाचित उशीरा झाला असेल." करण जोहरने चित्रपटातील एक दृश्य शेअर करत लिहिले, "इतक्या वर्षांनंतरही, ते आपल्याला कुटुंब, प्रेम, भरपूर आनंद आणि थोडे दुःख यांच्या शक्तीची आठवण करून देत आहे." या चित्रपटाने शाहरुख खान आणि काजोलला एक प्रतिष्ठित जोडी म्हणून स्थापित केले, काजोलच्या उत्साही व्यक्तिमत्त्वाने सर्वाधिक चाहते जिंकले.हा चित्रपट करण जोहरच्या हृदयाच्या अगदी जवळ आहे. त्याने हिंदी चित्रपटसृष्टीला एक मोठा हिट आणि एक कौटुंबिक चित्रपट दिला, दिग्दर्शक आणि निर्माता सूरज बडजात्या यांना टक्कर दिली, जो पूर्वी कुटुंबाभिमुख आणि रोमँटिक चित्रपटांसाठी ओळखला जात असे. करण जोहरने एकाच दिवसात चित्रपटाच्या स्टारकास्टलाही साइन केले. निर्मात्याने एकाच दिवसात चित्रपटासाठी सहा प्रमुख स्टार्सना साइन केले.करण जोहरने एका मुलाखतीत खुलासा केला की तो या चित्रपटात सर्व मोठ्या स्टार्सना सामील करू इच्छित होता. तो म्हणाला की एके दिवशी तो पहिल्यांदा शाहरुख खानच्या घरी पटकथा घेऊन गेला, जिथे त्याने चित्रपट वाचल्याशिवायही चित्रपटाला होकार दिला. त्यानंतर काजोलनेही होकार दिला. त्यानंतर तो अमिताभ बच्चन आणि जया यांच्या घरी गेला आणि कथा सांगितली आणि दोघांनीही चित्रपटाला होकार दिला.शेवटी, मी हृतिक रोशन आणि करीना कपूरच्या घरी पोहोचलो. चित्रपटाचे शीर्षकगीतही मोठ्या कष्टाने चित्रित करण्यात आले कारण गायिका लता मंगेशकर यांनी त्यावेळी गाणे थांबवले होते. संगीत दिग्दर्शक ललित पंडित यांच्या विनंतीवरून, त्याने चित्रपटाचे पहिले शीर्षकगीत रेकॉर्ड केले.

## अपघातात महिमा चौधरीचा चेहरा झाला विद्रूप

१९९० च्या दशकातील लोकप्रिय अभिनेत्री महिमा चौधरीने जेव्हा बॉलिवूडमध्ये खळबळ उडवून दिली तेव्हा तिने बॉलिवूडमध्ये पदार्पण केले. तिच्या अभिनयापेक्षा तिच्या लूकची जास्त चर्चा झाली. या अभिनेत्रीने शाहरुख खानसोबतच्या "परदेस" चित्रपटातून तिच्या चित्रपट कारकिर्दीची सुरुवात केली. तिच्या पहिल्याच चित्रपटातून ती घराघरात लोकप्रिय झाली. महिमाला तिच्या कारकिर्दीत खूप संघर्ष करावा लागला. तिला चित्रपटांमध्ये काम मिळू शकले नाही अशा काळातही तिला सामोरे जावे लागले. एका प्राणघातक अपघातापासून ते कायदेशीर प्रकरणांमध्ये ओढले जाण्यापर्यंत, स्तनाचा कर्करोग आणि तिच्या विवाहित जीवनापर्यंत, तिने बरेच काही सहन केले आहे. आता, अभिनेत्रीने तिच्या प्राणघातक अपघाताच्या घटनेची आठवण केली आहे. अलिकडेच महिमा चौधरी सिद्धार्थ कन्नन्च्या पॉडकास्टवर दिसली. संभाषणादरम्यान तिने तिच्या कारकिर्दीबद्दल आणि आयुष्यातील संघर्षांबद्दल चर्चा केली. संभाषणादरम्यान, अभिनेत्रीने अजय देवगणच्या चित्रपटाच्या शूटिंगदरम्यान घडलेल्या एका घटनेचेही वर्णन केले, ज्यामध्ये ती मृत्यूपासून थोडक्यात बचावली. अभिनेत्रीने १९९९ मध्ये आलेल्या "दिल क्या करे" चित्रपटात अजयसोबत काम केले होते आणि या काळात तिचा मोठा अपघात झाला. तिच्या चेहऱ्यावर काचेचे ६७ तुकडे बसले होते.महिमाने सांगितले की तिच्या पहिल्या चित्रपटानंतर तिच्या आयुष्यात तिला अनेक आव्हानांचा सामना करावा लागला. पदार्पणानंतर ती एका कायदेशीर प्रकरणात अडकली होती. तिचा एक अपघात झाला, त्यानंतर तिला एक वर्ष तिच्या घरीच बंदिस्त ठेवण्यात आले. सेटवर झालेल्या या अपघाताची आठवण करून देत, महिमाने सांगितले की तिच्या चेहऱ्यावर काचेचे ६७ बारीक तुकडे होते, जे डॉक्टरांना सूक्ष्मदर्शकाचा वापर करून खरवडून काढावे लागले. त्यानंतर, तिचा चेहरा बराच सुजला आणि तिचा संपूर्ण आकार विकृत झाला. तिच्या मैत्रिणीही शस्त्रक्रियेवर हसल्या, त्यांना वाटले की अभिनेत्री भांडणात पडली आहे. तिच्यासाठी तो एक कठीण काळ होता, कारण तिला पुढे काय करायचे हे माहित नव्हते. महिमा चौधरी गेल्या काही दिवसांपासून तिच्या आगामी "दुर्लभ प्रसाद की दुसरी शादी" या चित्रपटामुळे चर्चेत आहे. हा रोमँटिक कॉमेडी चित्रपट १९ डिसेंबर रोजी थिएटरमध्ये प्रदर्शित होणार आहे.



## IPL 2026 ऑक्शन

## अनकॅप्ड ‘खेळाडूंना’ मिळणार चमकण्याची संधी

# लिलावात अनकॅप्ड खेळाडूंचे मूल्य!

। मुंबई ।

प्रतिनिधी : महाईन्यूज

**आयपीएल २०२६ चा मिनी लिलाव सुरु व्हायला काही तास शिल्लक आहेत. यामध्ये अनेक खेळाडूंना सामील करण्यात आले आहेत. रवि बिश्नोई, कॅमरीन ग्रीन यांसारख्या खेळाडूचा समावेश लिलावामध्ये दिसणार आहे. आता होणाऱ्या या मिनी लिलावावर क्रिकेट चाहत्यांची नजर असणार आहे. महान माजी ऑफस्पिनर रविचंद्रन अश्विन हा त्याच्या युट्यूब चॅनेलवर त्याच्या क्रिकेट संदर्भात अनेक विचार मांडत असतो यामध्ये त्याने आयपीएल लिलावाच्या संदर्भात देखील भाष्य केले होते.**

## लिलावात मिळणार ‘छप्परफाड’






आयपीएल २०२६ चा मिनी लिलाव मंगळवारी अबू धाबी येथे होणार आहे. लिलावापूर्वी, महान माजी ऑफस्पिनर रविचंद्रन अश्विनने काही भारतीय अनकॅप्ड खेळाडूंची भविष्यवाणी केली आहे जे लिलावात चमकू शकतात आणि फ्रँचायझींना मोठ्या प्रमाणात पैसे मिळवून देऊ शकतात. अश्विनने अशा दोन भारतीय यष्टीरक्षकांची भविष्यवाणी केली आहे. त्यांना विश्वास आहे की त्यापैकी किमान एकाला अपेक्षेपेक्षा जास्त पैसे मिळू शकतात. ज्येष्ठ क्रीडा पत्रकार विमल कुमार यांच्याशी त्यांच्या ‘अश की बात’ या यूट्यूब शोमध्ये बोलताना, अश्विनने लिलावात फ्रँचायझींसाठी संभाव्य उमेदवार म्हणून कार्तिक शर्मा आणि सलील अरोरा यांचा विशेषतः उल्लेख केला. तसेच, आणखी एक अनकॅप्ड खेळाडू, तुषार रहेजा, याच्याकडे लिलावात लक्षणीय क्षमता असल्याचेही सांगितले. लिलावात कोणता खेळाडू सर्वात जास्त किंमत मिळवेल असे आर. अश्विनला विचारले असता तो म्हणाला, “हे खूप कठीण आहे. कोणाला जास्त पैसे मिळतील हे सांगणे खूप कठीण आहे. पण दोन खेळाडूंपैकी, मला वाटते की एक सर्वात महागडा जाईल. एक कार्तिक शर्मा आणि दुसरा पंजाबचा खेळाडू सलील अरोरा.”अश्विन पुढे म्हणाला, “सलील अरोरा, त्याने अलिकडेच धावा केल्या आहेत (त्याने सय्यद मुश्ताक अली ट्रॉफी सामन्यात फक्त ४५ चेंडूत १२५ धावा केल्या) आणि त्याआधीही त्याने धावा केल्या आहेत. तो एक विकेटकीपर-फलंदाज देखील आहे. म्हणून ज्या संघाला कार्तिक शर्माची उणीव भासेल तो सलील अरोरा मागे जाईल. किंवा ज्या संघाला सलील अरोराची उणीव भासेल तो कार्तिक शर्मा मागे जाईल. या लिलावात अनकॅप्ड खेळाडूंचे मूल्य असेल. आणखी एक खेळाडू ज्याचे मूल्य भासेल तो म्हणजे तुषार राहेजा. तो तामिळनाडूचा आहे.”या यादीतील पहिले नाव ऑस्ट्रेलियाचा अष्टपैलू खेळाडू कॅमेरून ग्रीन याचे आहे. २६ वर्षीय ग्रीन आता पूर्णपणे तंदुरुस्त (फिट) आहे आणि आगामी हंगामात धमाकेदार कामगिरी करण्यासाठी सज्ज आहे. यावर्षी तो लिलावात सर्वात महागडा खेळाडू म्हणून उदयास येऊ शकतो, अशी अपेक्षा आहे. त्याने एकूण २९ सामने खेळले आहेत. २८ डावांमध्ये ४१.५९ च्या सरासरीने ७०७ धावा केल्या आहेत. २९ डावांमध्ये ४१.५ च्या सरासरीने १६ विकेट्स घेतल्या आहेत. दुखापतीमुळे ग्रीनने आयपीएल २०२५ च्या लिलावात सहभाग घेतला नव्हता.कॅमेरून ग्रीनप्रमाणेच अनेक संघांचे लक्ष इंग्लिश यष्टिरक्षक-फलंदाज जेमी स्मिथ याच्यावर केंद्रित झाले आहे. स्मिथ फलंदाजीसह यष्टिरक्षणामध्येही कुशल आहे. २५ वर्षीय स्मिथने इंग्लंडकडून एकूण ५ टी-२० आंतरराष्ट्रीय सामने खेळले आहेत. ५ डावांमध्ये २६ च्या सरासरीने १३० धावा केल्या आहेत. लियाम लिविंगस्टोन याने इंडियन प्रीमियर लीगमध्ये आतापर्यंत फार मोठी छाप सोडलेली नसली तरी, लीगमध्ये त्याची मागणी अजूनही कायम आहे. आगामी हंगामातही त्याच्यावर जोरदार बोली लागण्याची शक्यता आहे. त्याने ४९ सामने खेळले आहेत.२७ डावांमध्ये १३ विकेट्स घेतल्या आहेत. श्रीलंकेचा प्रतिभावान वेगवान गोलंदाज मथीशा पथिराना याच्या भेदक गोलंदाजीची सर्वांना कल्पना आहे. मात्र, त्याला दुखापतीची समस्या नेहमीच भेडसावते.

## ५ खेळाडू खाऊन जाणार भाव!

श्रीलंकेचा प्रतिभावान वेगवान गोलंदाज मथीशा पथिराना याच्या भेदक गोलंदाजीची सर्वांना कल्पना आहे. मात्र, त्याला दुखापतीची समस्या नेहमीच भेडसावते. जर तो तंदुरुस्त राहिला, तर त्याला उत्तर नाही. याच कारणामुळे सर्व संघांचे लक्ष त्याच्यावर आहे.लखनौ सुपर जायंट्सने रवी बिश्नोई याला रिलीज करण्याचा निर्णय अत्यंत धक्कादायक होता. आता तो लिलावाच्या पूलमध्ये आल्यामुळे, त्याच्यावर पुन्हा एकदा जोरदार बोली लागण्याची अपेक्षा आहे.

# इम्पॅक्ट प्लेअर नियम लवकरच रद्द?

## तुम्ही फक्त मैदानाबाहेर पडाल; हा एक मूर्ख नियम आहे

। मुंबई ।

प्रतिनिधी : महाईन्यूज

**न्यूझीलंडचा अष्टपैलू खेळाडू जेम्स नीशमने स्पष्टपणे म्हटले आहे की आयपीएल आणि इतर काही टी-२० लीगमध्ये लागू असलेला इम्पॅक्ट प्लेअर नियम रद्द करावा. आयएलटी२० मध्ये दुबई कॅपिटल्सकडून खेळणाऱ्या नीशमने इम्पॅक्ट प्लेअर म्हणून लीगमध्ये प्रवेश केला आणि पहिल्याच षटकात २२ धावा देऊन फक्त १६ धावा काढल्या.**




खेळाडूंना तयारीसाठी वेळ देण्यासाठी टी-२० लीगमधून हा नियम काढून टाकावा अशी त्याची इच्छा आहे. २०२३ पासून आयपीएलमध्ये लागू होणाऱ्या इम्पॅक्ट प्लेअर नियमावर क्रिकेट तज्ज्ञांकडून संमिश्र प्रतिक्रिया येत आहेत. टीम इंडियाचे माजी प्रशिक्षक राहुल द्रविड, माजी कर्णधार रोहित शर्मा आणि विराट कोहली या सर्वांनीच इम्पॅक्ट प्लेअर नियमाला विरोध केला आहे, कारण तो अष्टपैलू खेळाडूंना भरभराट होण्यापासून रोखतो आणि खेळाचे संतुलन बिघडवतो. आता, जेम्स नीशम यांनी या नियमाला मूर्खपणा म्हटले आहे. नीशमचा असा विश्वास आहे की खेळाडू त्यासाठी तयार नसतात, कारण एका वेळी एका खेळाडूला संधी दिली जाते आणि दुसऱ्या वेळी दुसऱ्या खेळाडूला.“हा एक मूर्खपणाचा नियम आहे. तो आयपीएलमध्ये काम करत नाही. खरे सांगायचे तर, तो अजूनही का आहे हे मला माहित नाही. तो खेळाडूंना सामन्यांसाठी योग्य तयारी करण्यापासून रोखतो. जर तुम्हाला वाटत असेल की तुम्ही खेळत नाही आहात, तर तुम्ही कधीही सामन्यापूर्वी योग्यरित्या सराव करू शकत नाही कारण शेवटच्या क्षणी तुम्हाला अंतिम इलेव्हनमध्ये समाविष्ट केले जाण्याची शक्यता असते.

## तर तुम्ही खेळत नाही आहात

त्यामुळे, तुम्ही तुमचा खेळ खरोखर विकसित करू शकत नाही,” जेम्स नीशम यांनी दुबई कॅपिटल्सने आयोजित केलेल्या संभाषणादरम्यान टाइम्स ऑफ इंडियाला सांगितले. तो पुढे म्हणाला, “हे खेळाडूंना खेळाच्या ज्या भागांमध्ये ते चांगले नाहीत त्यावर काम करण्यापासून रोखते. याचा अर्थ तुम्ही वाईट क्षेत्ररक्षक असू शकता आणि ते महत्त्वाचे नाही.

स्मार्ट PCMC SMART CITY

महाईन्यूज ™

epaper.mahaenews.com

ePaper

। मंगळवार ।
दि. 16 डिसेंबर 2025

पिंपरी-चिंचवड, मावळ आवृत्ती

## मिशन पिंपरी-चिंचवड महानगर पालिका निवडणूक

# प्रभाग 12 मधील मतदारांची नावे पुन्हा समाविष्ट!

### शांताराम बापू भालेकर यांची माहिती : भाजपाच्या सक्रियतेने नागरिकांचा मतदान हक्क सुरक्षित



। पिंपरी चिंचवड ।
प्रतिनिधी : महाईन्यूज

**आगामी महानगरपालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर प्रभाग क्रमांक १२ (त्रिवेणीनगर, तळवडे) मधील मतदार यादीतील त्रुटी दूर करण्यात भारतीय जनता पक्षाने महत्त्वाची भूमिका बजावली आहे. यापूर्वी अनेक मतदारांची नावे चुकीने प्रभाग क्रमांक १ आणि ११ मध्ये स्थलांतरित झाल्याचे आढळले होते.**

भाजपच्या स्थानिक कार्यकर्त्यांनी या गंभीर समस्येकडे त्वरित लक्ष देत, स्थलांतरित मतदारांची नावे पुन्हा प्रभाग क्रमांक १२ मध्ये समाविष्ट करण्यासाठी मोठी मोहीम राबवली. या मोहिमेत शांताराम बाप्पू भालेकर, शितल धनंजय वर्णेकर आणि अस्मिता अनिल भालेकर यांचा प्रमुख सहभाग होता. कार्यकर्त्यांनी मतदारांच्या घरोघरी जाऊन हरकती फॉर्म भरून घेतले तसेच विविध ठिकाणी विशेष कॅम्पचे आयोजन केले.

भारतीय जनता पक्षाच्या शिष्टमंडळाने ही बाब निवडणूक आयोग आणि प्रभाग कार्यालयाचे प्रमुख अधिकारी अतुल पाटील यांच्याकडे थेट मांडली. मतदारांच्या ओळखीची पडताळणी करण्यासाठी नेमलेल्या बूथ लेव्हल ऑफिसर (BLO) आणि प्रतिनिधींना भाजपच्या कार्यकर्त्यांनी मोलाची मदत केली. या प्रयत्नांमुळे आवश्यक कागदपत्रांची पूर्तता करण्यात आली आणि अखेर स्थलांतरित झालेली सर्व नावे पुन्हा प्रभाग क्रमांक १२ मध्ये समाविष्ट करण्यात आली आहेत.

> “मुलभूत मतदान हक्क सुरक्षित ठेवणे हे आमचे प्राथमिक कर्तव्य आहे. प्रभाग १२ मधील मतदारांच्या स्थलांतरित नावांचा मुद्दा त्वरित हाताळून, त्यांना त्यांच्या मूळ प्रभागात मतदानाचा अधिकार मिळवून देणे हे आमच्या पाठपुराव्याचे मुख्य उद्दिष्ट होते.”
>
> **–शांताराम बापू भालेकर,** मा. नगरसेवक.अधिकारी

मतदार आता त्यांच्या मूळ प्रभागात मतदानाचा हक्क बजावू शकणार आहेत. भाजपच्या या सक्रिय सहभागामुळे नागरिकांमध्ये समाधान आणि कौतुक व्यक्त केले जात आहे.

## सर्व रोग निदान आरोग्य शिबिरास नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद!

### पिंपरी-चिंचवड सोसायटी फेडरेशनचा पुढाकार : अध्यक्ष संजीवन सांगळे यांची माहिती

। पिंपरी चिंचवड । प्रतिनिधी : महाईन्यूज

**चिखली–मोशी–चऱ्होली–पिंपरी चिंचवड हाऊसिंग सोसायटी फेडरेशन व विठ्ठल मल्टी स्पेशलिटी हॉस्पिटल, तुपे वस्ती (पुणे–नाशिक हायवे) यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित करण्यात आलेल्या आठ दिवसीय सर्व रोग निदान आरोग्य शिबिरास नागरिकांचा उत्तम प्रतिसाद मिळत आहे. हे शिबिर रविवार दिनांक १४ डिसेंबर ते रविवार दिनांक २१ डिसेंबर २०२५ या कालावधीत आयोजित करण्यात आले आहे.**



> “पिंपरी चिंचवड शहरातील सोसायटीधारकांच्या आरोग्याची काळजी घेणे हे फेडरेशनचे प्रमुख उद्दिष्ट आहे. या सर्व रोग निदान शिबिरामध्ये कॅन्सरसह विविध आजारांवरील तज्ज्ञ डॉक्टरांची उपस्थिती असल्यामुळे नागरिकांना एकाच ठिकाणी दर्जेदार तपासणी व उपचार मिळत आहेत. त्यामुळे अधिकाधिक नागरिकांनी या आरोग्य शिबिराचा लाभ घ्यावा.
>
> **–संजीवन सांगळे,**
> **अध्यक्ष, पिंपरी चिंचवड हाऊसिंग सोसायटी फेडरेशन.**

शिबिराचे उद्घाटन रविवार दिनांक १४ डिसेंबर रोजी पद्मभूषण डॉ. गिरीशजी प्रभुणे व कामगार नेते सचिन भैय्या लांडगे यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी विविध क्षेत्रातील मान्यवर, सामाजिक कार्यकर्ते व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

या शिबिरामध्ये कॅन्सर तपासणी, स्त्रीरोग तपासणी, मणक्याचे व हाडांचे आजार, बालरोग, त्वचारोग, जनरल मेडिसिन आदी विविध आजारांची मोफत तपासणी तसेच माफक दरात उपचार उपलब्ध करून देण्यात येत आहेत. विविध आजारांवरील तज्ज्ञ डॉक्टर शिबिरस्थळी उपस्थित राहून रुग्णांची तपासणी करत आहेत.

शिबिराच्या पहिल्याच दिवशी परिसरातील विविध सोसायट्यांमधील तब्बल ३७९ नागरिकांनी तपासणी करून उपचार घेतले. पुढील सात दिवस हे शिबिर सकाळी १० ते सायंकाळी ५ वाजेपर्यंत सुरू राहणार असून, अधिकाधिक नागरिकांनी या संधीचा लाभ घ्यावा, असे आवाहन आयोजकांच्या वतीने करण्यात आले आहे. यासंदर्भात प्रतिक्रिया व्यक्त करताना पिंपरी चिंचवड हाऊसिंग सोसायटी फेडरेशनचे अध्यक्ष संजीवन सांगळे म्हणाले, “पिंपरी चिंचवड शहरातील सोसायटीधारकांच्या आरोग्यासाठी हे शिबिर अत्यंत महत्त्वाचे आहे.

## चऱ्होली बुद्रुक बाजारपेठेत

# अनुराधा साळुंके यांचा व्यापाऱ्यांशी संवाद

### व्यापारी वर्गाकिडून अनुराधा साळुंके यांना उत्स्फूर्त प्रतिसाद

। पिंपरी चिंचवड ।
प्रतिनिधी : महाईन्यूज

**पिंपरी चिंचवड: चऱ्होली बुद्रुक येथील बाजारपेठ परिसरात सामाजिक कार्यकर्त्या अनुराधा दीपक साळुंके यांनी प्रचार करत व्यापाऱ्यांशी संवाद साधला. .**



या वेळी नागरिकांकडून आणि व्यापारी वर्गाकडून त्यांना उत्स्फूर्त प्रतिसाद मिळताना दिसून आला. "नागरिकांना काम करणारा कार्यकर्ता हवा आहे," अशी भावना नागरिकांनी व्यक्त केली.

प्रचारादरम्यान नागरिकांशी थेट संवाद साधताना अनुराधा साळुंके म्हणाल्या की, "आता ही निवडणूक नागरिकांनीच हाती घेतली असून, विजयाचा विश्वास नागरिकांकडून मिळत आहे." नागरिकांनी दाखवलेला सहभाग आणि पाठिंबा हा आगामी काळासाठी महत्त्वाचा असल्याचे त्यांनी नमूद केले.

#### व्यापारी व भाजीविक्रेत्यांच्या प्रश्नांवर ठाम भूमिका

चर्चेदरम्यान व्यापारी वर्गाने हॉकर्स झोनची मागणी मांडली, तर भाजीविक्रेत्यांनी सुसज्ज भाजी मंडईची सुविधा उपलब्ध करून देण्याची अपेक्षा व्यक्त केली. या सर्व प्रश्नांवर पिंपरी चिंचवड महापालिकेमार्फत पाठपुरावा करून योग्य तोडगा काढण्याची ग्वाही अनुराधा साळुंके यांनी दिली.

> "व्यापारी वर्गाला महापालिकेच्या माध्यमातून सक्षम करणार आहे. व्यापारी आणि विक्रेत्यांकडून याचे स्वागत करण्यात आले आहे. नागरिकांच्या समस्या ऐकून त्यावर उपाययोजना करण्याची तयारी असल्यामुळे मतदारांकडूनच विजयाचा विश्वास अधिक दृढ होत आहे.
> **–अनुराधा दीपक साळुंके**


---

## एस. बी. पाटील पब्लिक स्कूलच्या विद्यार्थ्यांना 'लर्निंग जर्नल' पुरस्कार

### युनायटेड अरब अमिरात मधील अबुधाबी येथील "रोबो कप एशिया पॅसिफिक 2025" स्पर्धेत विद्यार्थ्यांची उत्कृष्ट कामगिरी

। पिंपरी चिंचवड ।
प्रतिनिधी : महाईन्यूज

**युनायटेड अरब अमिरात मधील अबुधाबी येथे झालेल्या "रोबो कप एशिया पॅसिफिक २०२५" या स्पर्धेत पिंपरी चिंचवड एज्युकेशन ट्रस्टच्या (पीसीईटी) रावेत येथील एस. बी. पाटील पब्लिक स्कूलच्या विद्यार्थ्यांनी उत्कृष्ट कामगिरी करत सर्वोत्कृष्ट लर्निंग जर्नल पुरस्कार मिळवला.**




या स्पर्धेत निर्वाण शाह, देवेंद्र चौधरी (इयत्ता आठवी) देवांश केदारी, आराध्या सातव (इयत्ता सातवी) यांनी सहभाग घेतला होता. सर्जनशीलता आणि तांत्रिक कौशल्याने शाळेचे प्रतिनिधित्व करत त्यांनी स्पर्धात्मक अशा रेस्क्यू लाइन प्रायमरी श्रेणीत एक कार्यशील रोबोट सादर केला. ज्यामध्ये कॅमेरा – आधारित लाइन, फॉलोअर सिस्टम आणि अतिरिक्त रेस्क्यू रोबोट यंत्रणा एकत्रित बसविण्यात आली होती. यासाठी शिक्षक प्रणय नेवारे व पालक सागर शाह यांनी मार्गदर्शन केले. पिंपरी चिंचवड एज्युकेशन ट्रस्टचे अध्यक्ष ज्ञानेश्वर लांडगे, उपाध्यक्षा पद्माताई भोसले, सचिव विठ्ठल काळभोर, खजिनदार शांताराम गराडे, विश्वस्त हर्षवर्धन पाटील, उद्योजक नरेंद्र लांडगे, अजिंक्य काळभोर, कार्यकारी संचालक डॉ. गिरीश देसाई यांनी विद्यार्थ्यांचे अभिनंदन करून त्यांना पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.


www.rklgis.org
RKL GALAXY
International School
CBSE Affiliated School | Jain Minority Institution
RKL Galaxy International School
EMPOWERING YOUNG MINDS THROUGH LEARNING
ADMISSION
OPEN
FOR THE YEAR
2026-27
NURSERY - STD X
What we Offer?
CBSE Curriculum
Separate Sports Teachers
for Indoor & Outdoor Sports
Digital Classrooms with AV Facilities
Skill Development Programs:
Robotics
Dance, Music, Speech & Drama
Entrepreneurship
Focus on Holistic Development
Enroll Now!
Admission open for 2026-27 | Book Your Spot Today!
8698360005 | 9637339988 | Opp. to Alankapuram Society, Wadmukhwadi, Alandi Road, Pune

## “प्री इलेक्शन धमाका”

# प्रशासकांकडून 250 कोटींच्या निविदा मंजुर!

### आचारसंहिता लागू होण्यापूर्वी महापालिकेची "लगीन घाई"; निर्णय वादात अडकण्याची शक्यता

। पिंपरी चिंचवड ।
प्रतिनिधी : महाईन्यूज

**महापालिका निवडणुकीची आचारसंहिता लागू होण्याच्या पार्श्वभूमीवर, आयुक्त आणि प्रशासक श्रावण हर्डीकर यांनी सोमवारी (१५) सकाळी १० वाजता बैठक घेतली आणि १५० हून अधिक प्रस्तावांना मान्यता दिली. घाईघाईत झालेल्या बैठकीत स्थायी समितीने सुमारे २५० कोटी रुपयांच्या कामांना मान्यता दिली. यामध्ये वादग्रस्त निविदा, काही प्रमुख कामे आणि कोट्यवधी रुपयांच्या वर्गीकरण तरतुदींचे प्रस्ताव समाविष्ट होते.**




राज्य निवडणूक आयोगाने सोमवारी दुपारी ४ वाजता पत्रकार परिषद घेऊन नगरपालिका निवडणुकांची घोषणा केली. त्यापूर्वी, प्रशासक श्रावण हर्डीकर यांनी ऑनलाइन बैठक घेऊन सर्वसाधारण सभा आणि स्थायी समितीच्या प्रस्तावांना मान्यता दिली. शेखर सिंग यांच्या बदलीनंतर, हर्डीकर यांच्याकडे निवडणूक होत असलेल्या आयुक्त पदाचा तात्पुरता कार्यभार आहे. आचारसंहिता जाहीर होण्यापूर्वी त्यांनी हे निर्णय घेतले. आचारसंहितेच्या भीतीने, कंत्राटदार आणि सल्लागार आयुक्त, अतिरिक्त आयुक्त, शहर सचिव, शहर अभियंता आणि काही इतर अधिकाऱ्यांच्या दालनात व्यस्त होते. कामाचे प्रस्ताव मंजूर करण्यात आले आणि काही कामाचे आदेश मागे घेण्यात आले.

दरम्यान, नगरपालिका निवडणुका जाहीर झाल्या आहेत आणि १६ जानेवारीनंतर नगरसेवकांची निवड महापालिकेत होईल. त्यांच्या समितीमार्फत निर्णय घेतले जातील. त्यामुळे काही अधिकारी आणि कंत्राटदारांनी प्रशासकाकडून कामाला मंजुरी मिळवून देण्याचा प्रयत्न केला.

निवडणुकीपूर्वी प्रशासकाने घेतलेले निर्णय वादाचा विषय होण्याची शक्यता नाकारता येत नाही. काळजीवाहक नियुक्तीसाठी १५४ कोटी रुपयांची वादग्रस्त मोठी निविदा, प्रादेशिक कार्यालय इमारत बांधण्यासाठी ४३ कोटी रुपयांची निविदा आणि विविध भागात ड्रेनेज लाईन टाकण्यासाठी २० कोटी रुपयांची कामे मंजूर करण्यात आली.

याव्यतिरिक्त, आरोग्य कार्ड देखभाल आणि दुरुस्ती, निवडणुकीशी संबंधित काम, रस्ते दुरुस्ती, क्रीडांगणे, इमारत बांधकाम आणि महानगरपालिका शाळा आणि दवाखाने देखभाल आणि दुरुस्ती यासह विविध कामे मंजूर करण्यात आली आहेत.

### स्थायी निर्णय आणि कामाचे आदेश रद्द करा: भापकर

या तातडीच्या बैठकीला आक्षेप घेत सामाजिक कार्यकर्ते मारुती भापकर यांनी हे निर्णय थांबवण्याची मागणी केली. आवश्यक कायदेशीर प्रक्रिया न पाळता काही निर्णय आणि कार्यादेश जारी करण्यात आले आहेत, असे त्यांनी सांगितले. ही अत्यंत गंभीर बाब आहे आणि प्रशासकांनी असे करू नये. स्थायी समितीने घेतलेले निर्णय रद्द करावेत आणि कोणतेही कार्यादेश जारी करू नयेत अशी मागणी त्यांनी केली.

